रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २७
www.ramprahar.com

रविवार, १३ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कर्तव्यावेळी मृत झालेल्या पोलिसांच्या विधवांना मिळणार आर्थिक लाभ/२

रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४

रायगड जिल्हास्तरीय क्लासिक बेंच प्रेस स्पर्धा/८

## अन्वर उल हक पाकिस्तानचे काळजीवाहू पंतप्रधान



**इस्लामाबाद** : पाकिस्तानचे मावळते पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या राजीनाम्यानंतर राजकीय गदारोळात अन्वर उल हक काकर यांची पाकिस्तानचे काळजीवाहू पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आली आहे. शाहबाज शरीफ आणि नॅशनल असेंब्लीतील विरोधी पक्षनेते राजा रियाझ यांनी अन्वर काकर यांच्या नावावर सहमती दर्शवल्याचे वृत्त आहे. ते लागलीच शपथ घेऊ शकतात, असेही सांगण्यात आले आहे. बलुचिस्तानचे खासदार अन्वर काकर यांची काळजीवाहू पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आली आहे, असे पाकिस्तानी पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या निवेदनातही म्हटले आहे. काकर हे बलुचिस्तानचे खासदार आहेत. पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्र्सनुसार ९ ऑगस्ट रोजी संसद विसर्जित झाल्यामुळे शाहबाज शरीफ यांचा कार्यकाळही संपुष्टात आला आहे.

# देशातून पेट्रोल-डिझेल हद्दपार करायचेय

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन; पुण्यातील चांदणी चौक प्रकल्पाचे उद्घाटन





**पुणे : प्रतिनिधी**

आपल्या देशातून पेट्रोल आणि डिझेल हद्दपार करायचे आहे. त्यासाठी इथेनॉल, मिथेनॉल आणि हायड्रोजन याचा वापर वाढवा. कचऱ्यापासून वीजनिर्मिती करू नका, तर ग्रीन हायड्रोजन तयार करा, कारण ग्रीन हायड्रोजन हेच भविष्य असल्याचे प्रतिपादन केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी (दि. १२) पुणे येथे केले. चांदणी चौकातील उड्डाणपूल व रस्ते विकास प्रकल्पाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ऑनलाईन, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार माधुरी मिसाळ व भीमराव तापकीर, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील आदी प्रत्यक्ष उपस्थित होते.

या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, पुण्यातील रस्त्यांसाठी मेधा कुलकर्णी यांनी अनेक प्रयत्न केले आहेत. अडचणींवर मात करून चांदणी चौकातील रस्त्याचे काम पूर्ण झाले. येथील पूल उभारण्यासाठी परदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. पुण्यात ४० हजार कोटींची कामे भविष्यात पूर्ण करणार आहोत.

पुणे शहर दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच पुण्यातील वाहनांची संख्याही वाढली आहे. पुण्याच्या विकासासाठी ४० हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यामधे दोन-तीन मजली उड्डाणपूल आहेत. वाहतूक कोंडीतून पुणेकरांची सुटका होण्यासाठी हवेतून चालणाऱ्या स्कायबस आपण येथे आणणार असून या बसमधून एका वेळेस २५० प्रवाशांना प्रवास करता येणार आहे, असेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

पुण्यात आता डबल इंजिन लागले आहे. आधी एक दादा होते. आता दोन दादा झाले आहेत. त्यामुळे चंद्रकांतदादा आणि अजितदादा दोघांनी मनात आणले, तर त्यांच्या नेतृत्वाखाली पुण्याचा विकास होणारच आहे. पुण्याला पाणी, हवा आणि ध्वनी प्रदूषणातून मुक्त करण्यात येईल, असेही ना. गडकरी यांनी म्हटले.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबईमध्ये आम्ही मेट्रो २ लाईन सुरू केली. त्या कॉरिडॉरखालचा जवळपास दोन लाख वाहनांचा ट्रफिक आम्ही संपवू शकलो. मुंबईतील बरीच वाहतूक कोंडी सोडवू शकलो. तशीच वाहतूक कोंडी आम्ही पुण्यातही सोडवणार आहोत, तर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, चांदणी चौकातील काम होण्यासाठी अडचणी आल्या, अनेकांनी पाठपुरावा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. शेवटी सगळी सोंग करता येतात, पण पैशाचे सोंग करता येत नाही, परंतु केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिलदारपणे हाही प्रश्न सोडवला.

### मंत्री असावा तर नितीन गडकरींसारखा -उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भाषणात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे कौतुक केले. एखादा मंत्री कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे नितीन गडकरी. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली देशात ज्या प्रकारे बोगदे, फ्लायओव्हर, राष्ट्रीय महामार्ग, अनेक शहरांमध्ये रिंग रोड झाले या सर्वांची जबाबदारी गेल्या अनेक वर्षांपासून नितीन गडकरी यांनी उचलली आहे. त्यापूर्वी युती सरकारच्या काळातही त्यांनी मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे उभारला आहे. जे चांगले काम करतात त्याचा विसर जनता कधीही पडू देत नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री पवार यांनी मंत्री गडकरींचे कार्य अधोरेखित केले.

### पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणार -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुण्याच्या चोहोबाजूंनी वेगवेगळ्या शहरांकडे जाणारे रस्ते आणि त्या रस्त्यांची कोंडी यामुळेच पुण्याची वाहतूक कोंडी वाढते. सोलापूरहून पुण्याला येण्यासाठी दोन-अडीच तास लागतात, पण पुण्याच्या जवळ आले की, वाहतूक कोंडीमुळे तेवढाच वेळ शहरात येण्यासाठी लागतो. अशी सगळी कोंडी दूर करण्यासाठी केंद्रीय नितीन गडकरी डबलडेकर फ्लाय ओव्हर तयार करणार आहेत. फक्त डबलडेकर फ्लाय ओव्हर नाही, तर एलिव्हेटेड रस्ते तयार करण्याचा त्यांचा प्लान आहे. तो अमलात आणण्यासाठी राज्य सरकार पूर्णपणे सहकार्य करेल, जेणेकरून येत्या काळामध्ये वाहतुकीची कोंडी नसलेले शहर म्हणून पुणे शहराची ओळख निर्माण करता येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी म्हणाले.

# पनवेलमध्ये गर्दीच्या ठिकाणी बसविले सीसीटीव्ही कॅमेरे

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली कंट्रोल रूमची पाहणी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गर्दीच्या व महत्त्वाच्या ठिकाणी शहर पोलीस ठाण्याच्या वतीने ४४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे कॅमेरे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. १२) भेट देऊन त्यांनी सीसीटीव्ही कंट्रोल रूमची पाहणी केली. त्या वेळी ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत उमेश इनामदार, प्रकाश खैरे आदी उपस्थित होते. त्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी स्वागत केले.

या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना पनवेल शहर परिसरात गर्दीच्या ठिकाणी सद्यस्थितीत बसवण्यात आलेल्या ४४ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची आणि त्यांचा कंट्रोल रूम पनवेल शहर पोलीस ठाण्यात नैमुद्दीन शेख (रिंटू) सीसीटीव्ही टेक्निशयन यांच्या माध्यमातून बसवण्यात आल्याची माहिती दिली. या कंट्रोल रूममध्ये आगामी काळात आधुनिक पद्धतीने स्पिकर यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याद्वारे एखाद्या ठिकाणी गर्दी झाल्यास किंवा कोणती दुर्घटना घडल्यास या कंट्रोल रूममधूनच स्पिकरच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येईइ. हा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथमच पनवेलमध्ये केला जाणार आहे.

शहरातील गर्दीची ठिकाणे बाजारपेठ, सराफ बाजार, मिरची गल्ली आदी ठिकाणच्या वाहतूक कोंडीसंदर्भातसुद्धा या वेळी चर्चा झाली व लवकरच वाहतूक अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आगामी सणासुदीच्या काळात शहरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पनवेल शहरात अजूनही जास्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज असल्याने या संदर्भात आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासनदेखील आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले.

## निवडक

### आसाममध्ये महापूर; सुमारे ३० हजार लोकांना फटका

**आसाम** : भारताच्या ईशान्येकडील आसाम राज्यात जलप्रलय आला आहे. आसाममधील सहा राज्यांमध्ये भीषण पूरस्थिती निर्माण झाली असून हजारो नागरिकांना याचा फटका बसला आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार १७५ गावे पाण्याखाली गेली असून सुमारे ३० हजार लोकांना या पुराचा फटका बसला आहे.

### दिल्ली सेवा विधेयकाला राष्ट्रपतींनीही दिली मंजुरी

**नवी दिल्ली** : संसदेच्या दोन्ही सभागृहात दिल्ली सेवा विधेयक मंजूर झाल्यानंतर आता राष्ट्रपतींनी त्याला संमती दिली आहे. यासह १९ मे रोजी जारी करण्यात आलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर झाले आहे. नव्या कायद्याद्वारे केंद्राने राष्ट्रीय राजधानी नागरी सेवा प्राधिकरण निर्माण करण्याचा निर्णय घेतलाय. या माध्यमातून प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, बदल्यांची फाइल नायब राज्यपालांकडे जाईल.

# कर्जतमध्ये मुलींची छेड काढणाऱ्या रोडरोमियोंना नागरिकांकडून चोप


**नेरळ : प्रतिनिधी**


कर्जत शहरात तीन मैत्रिणी क्लासवरून घरी जात असताना त्यांची रस्त्यात छेड काढणाऱ्या दोन तरुणांना क्लासच्या टीचर व ग्रामस्थांनी पकडून चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिले. हा प्रकार शुक्रवारी (दि. ११) सायंकाळी घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कर्जत परिसरातील दहावीत शिकणाऱ्या काही मुली नानामास्तर नगर येथील बेडेकर क्लासमध्ये नेहमीप्रमाणे गेल्या होत्या. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास क्लास सुटल्यावर यातील तीन मैत्रिणी एकत्र घरी परतत असताना कर्जत शहराकडे जाणाऱ्या रिलायन्स पेट्रोल पंपासमोर मोटरसायकलवरून आलेले दोन तरुण त्यांचा पाठलाग करीत होते. हे तरुण मुलींभोवती मोटरसायकल फिरवून त्यांची छेड काढत असल्याने घाबरून गेलेल्या या अल्पवयीन मुलींनी क्लास टीचर यांना याबाबत माहिती दिली होती. क्लास टीचरनी तरुणांना जाब विचारला. या वेळी तेथे उपस्थित नागरिकांनीदेखील धाव घेत मुलींची छेड काढत असल्याने त्या तरुणांना चोप देऊन कर्जत पोलिसांच्या ताब्यात दिले.

अरमान सुलतान मालदार आणि अल्ताफ निजाम काझी (रा. पोटल पाली, ता. कर्जत) अशी या तरुणांची नावे आहेत. हे दोघे क्लासला जाणाऱ्या मुलींची गेले काही दिवस रस्ता अडवून छेड काढत होते. घटनेचे गांभीर्य ओळखून कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड, माथेरान पोलीस ठाण्याचे शेखर लव्हे घटनास्थळी हजर झाले. मुलींच्या कुटुंबीयांनीही तेथे धाव घेतली, तर शहरातील नागरिकांची एकच गर्दी जमली होती.

मुलींची छेड काढल्याप्रकरणी ताब्यात घेतलेल्या अरमान मालदार आणि अल्ताफ काझी या तरुणांवर कर्जत पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत तसेच मुली अल्पवयीन असल्याने 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**खालापूर, रत्नागिरी : वीकेण्डसह सलग सुट्या आल्याने मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शनिवारी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या, तर दुसरीकडे मुंबई-गोवा महामार्गावर निवळी घाटात गॅस टँकर उलटल्याने वाहतूक थांबवावी लागली.**

### दरड कोसळून पाच जणांचा मृत्यू

**रुद्रप्रयाग : वृत्तसंस्था**

उत्तराखंडच्या रुद्रप्रयाग जिल्ह्यात केदारनाथ यात्रा मार्गावर शनिवारी (दि. १२) दरड कोसळली. या घटनेत गुजरातच्या तीन व्यक्तींसहीत एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

केदारनाथ यात्रा मार्गावर फाटा क्षेत्र येथे ही दरड कोसळण्याची घटना घडली. यामुळे मलब्याखाली अडकून पाच जणांचा मृत्यू झाला आहे. मृतामध्ये गुजरातच्या तीन आणि हरिद्वारच्या एका जणचा समावेश आहे, तर पाचव्या व्यक्तीची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू होती.

दरम्यान, पावसामुळे विस्कळीत झालेली राज्यातील स्थिती पाहता आपत्तीमुळे बाधित झालेल्या त्वरित मदत करण्याचे आदेश उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी दिले आहेत.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून सई सावंतला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परदेशातील शिक्षणासाठी पनवेल येथील सई सुनील सावंत या विद्यार्थिनीला माजी आमदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून २५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रांत गेल्या २७पेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते.

सई सावंत अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ पोर्टलँड येथे मास्टर्स ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणार आहेत. त्या अनुषंगाने तिला आर्थिक मदत करण्यात आली आहे.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त 'सीकेटी'त कार्यक्रम

### देशाचा स्वातंत्र्यलढा सर्वांसाठी प्रेरणादायी -अर्चना ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रम होत आहेत. अनेक स्वातंत्र्यवीर व सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देशाला मिळवून दिलेले स्वातंत्र्य मौल्यवान आहे तसेच स्वातंत्र्याची गाथा ही संघर्ष, धैर्य आणि शौर्याची आहे. त्यामुळे आपला स्वातंत्र्याचा लढा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्य अर्चना ठाकूर यांनी शनिवारी (दि. १२) केले. संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.




सीकेटी विद्यालय इंग्लिश मीडियम प्राथमिक विभागातर्फे देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा तसेच तालुका, जिल्हा, राष्ट्रीय स्तरावरील कला आणि क्रीडा विभागात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पालक-शिक्षक प्रतिनिधी सुधीर ठाकूर, अनुराधा जाधव, मराठी माध्यम पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, योगिनी माने, प्रिया नायर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी स्नेहल कडव आणि जसप्रीत कौर सग्गू यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार तसेच देशभक्तीपर नाटिकेचे सादरीकरण करून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

# जेएनपीए सेंट मेरी विद्यालयात आग





**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदर वसाहतीमधील सेंट मेरी विद्यालयात शुक्रवारी (दि. ११) रात्री ११च्या सुमारास आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी ही आग नियंत्रणात आणली. शाळा बंद असताना ही घटना घडल्याने अनर्थ टळला.

शाटसर्किटमुळे केबलला ही आग लागली. यात विद्यालयाचे नुकसान झालेले नाही असे समजते,

### रात्रीच्या वेळी घटना घडल्याने अनर्थ टळला

पण शाळा सुरू असताना आगीची घटना घडली असती, तर विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असता. त्यामुळे या आगीचा बोध घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करावी, जेणेकरून पुन्हा आगीसारख्या घटना घडणार नाहीत, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

# कर्तव्य बजावताना मृत पावलेल्या पोलिसांच्या विधवांना मिळणार आर्थिक लाभ

## राज्यातील गृह विभागाचा मोठा निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात नक्षलवादी, अतिरेकी कारवाई तसेच दरोडेखोरी, संघटित गुन्हेगारी विरोधी कारवाई आणि कर्तव्य बजावताना मृत आणि जखमी झालेल्या पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्याच्या विधवा पत्नीला आता आर्थिक लाभ पुन्हा मिळणार आहेत. राज्य सरकारकडून पुनर्विवाह केल्यानंतर शहिदांच्या पत्नीचे वेतन बंद करण्यात आले होते. विधवांनी पुनर्विवाह केल्याने शहिदांच्या कुटुंबीयांची आर्थिक फरफट सुरु होती. राज्य सरकारकडून पुनर्विवाह केला आहे, अशा विधवा पत्नीस कुटुंबीय या नात्याने दिवंगत अधिकारी-कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत वेतन देण्यासाठी मान्यता दिली आहे. त्यामुळे कर्तव्यावर असताना मृत झालेल्या पोलीस अधिकारी-कर्मचारी यांच्या पुनर्विवाह केलेल्या विधवांना १३ ऑगस्ट २०१३च्या निर्णयानुसार राज्य सरकारच्या निर्णयातील तरतुदींप्रमाणे संपूर्ण वेतनाचा लाभ अदा करण्यात येणार आहे. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पुनर्विवाह करणाऱ्या शहिदांच्या विधवांना दिलासा मिळाला आहे.

पोलिसांच्या मृत्यूनंतर विधवा पत्नीला शासनाकडून वेतन दिले जाते, मात्र पुनर्विवाह केल्यानंतर शहिदांच्या पत्नीचे वेतन बंद करण्यात आले होते. त्यामुळे राज्यातील अनेक शहिदांच्या पत्नी व कुटुंबीयांनी याबाबत तक्रार केली होती. त्यामुळे विधवांनी पुनर्विवाह केल्याने शहिदांच्या कुटुंबीयांची सुद्धा फरफट सुरू होती.

### दिवंगत जवानाच्या कुटुंबीयांचा करावा लागणार सांभाळ

***दरम्यान, पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्याच्या उत्पन्नावर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या शहिदांचे वयोवृद्ध आई-वडील, अविवाहित, दिव्यांग बहीण-भाऊ व अज्ञानी पाल्य यांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांना घ्यावी लागणार आहे. तसे हमीपत्र संबंधित घटक प्रमुखांनी संबंधित विधवांकडून घ्यावे लागेल. मृताच्या उत्पन्नावर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचे पालनपोषण करण्यात येत नसेल, तर संपूर्ण वेतनाचा लाभ बंद करण्यात येईल तसेच याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने निराकारण झाल्यास पुढील संपूर्ण वेतनाचे प्रदान पुन्हा सुरु करण्यात येईल, असेही आदेशात म्हटले आहे.***

# पनवेल एसटी आगारात उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

**पनवेल : वार्ताहर**



फलकाद्वारे जनजागृती करून, तोंडी आवाहन करून सुधारणा होत नसल्याने पनवेल एसटी आगार व्यवस्थापकांनी नियम न पाळणाऱ्यांसाठी सुरक्षारक्षकांच्या दंडुक्याचा आधार घेण्याची वेळ आली आहे.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बस आगारांमधील सर्वेक्षणात पनवेल बस आगाराला ४१ गुण मिळाले. ९ एकर जागेवर पनवेल बस आगार विस्तारले आहे. ३३०० बस दिवसाला आगारामध्ये ये-जा करतात. प्रवासी व त्यांना सोडणारे इतर असे ४० हजार नागरिक या आगारात ये-जा करतात. दोन कोटी रुपयांचे महिन्याचे तिकीटातून उत्पन्न होणाऱ्या आगारात सर्वात मोठी समस्या नागरिकांची स्वयंशिस्तीची आहे. आगार व्यवस्थापक पदाचा पदभार सूजीत डोळस यांनी घेतल्यानंतर मे महिन्यापासून आगारामधील अंतर्गत स्वच्छतेकडे लक्ष केंद्रीत केले. आगारामध्ये २७८ कर्मचारी काम करतात. हे कर्मचारीसुद्धा स्वच्छतेसाठी पुढाकार घेत आहेत. स्वत:पासून स्वच्छतेची सुरुवात करुया असे धडे आगारातून देण्यासाठी जनजागृतीचे फलक लावण्यात आले आहेत, मात्र हजारोंच्या संख्येने येणाऱ्या प्रवाशांना वेळोवेळी आवाहन करूनही सार्वजनिक शौचालयाचा वापर न करता मोकळ्या जागेवर पुरुषांकडून उघड्यावर लघुशंका करण्याचे प्रकार वाढले आहेत.

सार्वजनिक शौचालयाची सोय करूनही प्रवासी उघड्यावर जात असल्याने या ठिकाणी सुरक्षारक्षक कायमस्वरुपी नेमण्याची वेळ पनवेल बसआगार प्रमुखांवर आली आहे. अखेर व्यवस्थापक डोळस यांनी रक्षकांना आवाहन करूनही न ऐकणाऱ्यांना दंडुक्याचा प्रसाद देण्याची सूचना केली आहे.

## निवडक

### आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा



**उरण :** राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रो. डॉ. जगन्नाथ खेमानर,सिनेट सदस्य, मुंबई विद्यापीठ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून आजच्या युवकांसमोरील आव्हाने याविषयावर चर्चा केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राम गोसावी यांनी केले. कार्यक्रमास डॉ. संदीप घोडके, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा. रेणू सरोज उपस्थित होत्या. प्रा. श्रीकांत गोतपागर यांनी सूत्रसंचालन केले तसेच आरती सुरवसे हिने आभार मानले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

### मतदार नाव नोंदणी कार्यक्रम



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता क्लब व उरण तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात मा. नायब तहसीलदार माधुरी मॅडम यांनी १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मतदान यादीत नाव नोंदविण्याचे आवाहन केले. बीएलओ अरुणा गायकवाड, लिपिक श्री. शेख, कोतवाल वैशाली भोईर आणि महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण, प्रा. व्ही. एस. इंदूलकर, प्रा. ए. के. गायकवाड, प्रा. ए. आर. कांबळे, डॉ. डी पी हिंगमिरे, नोडल अधिकारी डॉ. एम. जी. लोने आणि विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. या वेळी ५० विद्यार्थ्यांनी मतदार यादी नाव नोंदणी अर्ज भरून दिला.

### पुनाडे कातकरवाडीत शालेय साहित्यवाटप



**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर फुंडे कॉलेजमध्ये रसायनशास्त्र विभागामार्फत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुनाडे कातकरीवाडी या ठिकाणी बीएससी भाग तीन या वर्षातील सर्व मुले व प्राध्यापकांनी मुलांना शालेय साहित्य वाटपाचे काम पूर्ण केले. शाळेचे मुख्याध्यापक निवाले गुरुजी, रसायशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्मिता तांदळे, डॉ. मऱ्याप्पा सोनवले, प्रा. यशवंत गायकवाड, डॉ. गुरुमित वादवा, प्रा. चेतना तुमडे, रवी म्हात्रे यांनी कारकर्म यशस्वीपणे पूर्ण केले. प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहकार्य लाभले आहे.

# कर पुनर्निरीक्षण प्रभागनिहाय मोहिमेत नागरी तक्रारींचे निवारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर विभागामार्फत ११ व १२ ऑगस्ट या कालावधीत प्रभाग समिती क कामोठे कार्यालयांमध्ये मालमत्ताधारकांच्या मालमत्ते संबंधित तक्रारीचे निवारण तत्काळ करण्यासाठी कर पुनर्निरीक्षण मोहीम राबविण्यात आली. नागरिकांचा या प्रभागनिहाय मोहिमेस उत्तम प्रतिसाद मिळाला. या मोहिमेदरम्यान सुमारे दोन हजारांहून अधिक अर्ज नागरिकांनी दाखल केले. या वेळी कामोठे प्रभाग कार्यालयात उपायुक्त गणेश शेटे यांनी स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून मालमत्ताधारकांना मार्गदर्शन केले.

नागरिकांच्या मालमत्ता कराबाबत त्रुटींचे निवारण करण्यासाठी ७ व ८ ऑगस्ट रोजी खारघर प्रभाग कार्यालयात कर पुनर्निरीक्षण मोहीम राबविण्यात आली. या ठिकाणी नागरिकांनी सुमारे २०७ अर्ज दाखल केले. त्यानंतर प्रभाग समिती ब कळंबोली कार्यालय येथे ९ व १० ऑगस्ट कर पुनर्निरीक्षण मोहीम राबविण्यात आली. या ठिकाणी नागरिकांनी सुमारे १८००हून अधिक अर्ज दाखल केले. तसेच प्रभाग समिती क कामोठे कार्यालय येथे ११ व १२ ऑगस्ट रोजी झालेल्या कर पुनर्निरीक्षण मोहीमेध्ये नागरिकांनी दोन हजारांहून अधिक अर्ज दाखल केले. या तिन्ही ठिकाणी नागरिकांना त्यांच्या बिलामधील किरकोळ दुरूस्त्या तात्काळ करून देण्यात आल्या तसेच बिलामधील इतर दुरूस्त्यांचे कामही वेगाने करण्यात येत आहे.

यानंतर प्रभाग समिती ड कार्यालय पनवेल येथे १७ व १८ ऑगस्ट या दिवशी त्या त्या प्रभागांमध्ये सकाळी १०.३० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत कर पुनर्निरीक्षण मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती मालमत्ता कर विभाग उपायुक्त गणेश शेटे यांनी दिली आहे. या मोहिमेमध्ये नागरिकांच्या किरकोळ तक्रारी तत्काळ सोडविल्या जात आहे. महापालिकेने एप्रिल महिन्यापासून ते आजपर्यंत १७५ कोटीहून अधिक वसुली केली आहे.

# पनवेलमध्येही घरोघरी तिरंगा फडकविण्याचे आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या निर्देशांनुसार १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत गतवर्षीप्रमाणेच 'घरोघरी तिरंगा' फडकविण्याचे आवाहन पनवेल महापालिका आयुक्त तथा प्रशासकगणेश देशमुख यांनी केले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत मागील वर्षीप्रमाणेच यावर्षीही दिनांक १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत 'घरोघरी तिरंगा' मोहीम राबविली जात असून प्रत्येक नागरिकाने आपल्या घराबाहेर तिरंगा ध्वज फडकवून राष्ट्राविषयीचे प्रेम व्यक्त करावयाचे आहे. या कालावधीत महापालिका क्षेत्रातील प्रत्येक घरावर नागरिकांकडून उत्स्फुर्तपणे तिरंगा फडकविला जाणे अपेक्षित आहे.

महापालिकेने नागरिकांना राष्ट्रध्वज उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्यावतीने सुमारे सव्वा लाख झेंडे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. चारही प्रभाग कार्यालयात नागरिकांना हे राष्ट्रध्वज वितरीत करण्यात येत आहेत.

आपल्या देशाबद्दल प्रत्येकाच्या मनात असलेला आदर व सन्मान अभिव्यक्त करण्यासाठी 'घरो घरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा' ही मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन राष्ट्रध्वजाचे सर्व नियम पाळून राष्ट्राप्रती असलेले प्रेम व्यक्त करावे.



### विविध कार्यक्रम

***स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमाच्या समारोपानिमित्ताने संपूर्ण राज्यात व देशात शूर वीरांना वंदन करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. पनवेल महापालिकेच्या वतीने १४ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजता शशांक कल्याणकर यांच्या समुहाचा स्वातंत्र्यगाथा- सैनिक हो तुमच्यासाठी या गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहांमध्ये करण्यात आले आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांनी केले आहे.***

# श्रमिक सेनेमुळे एनएमएमटी कर्मचाऱ्यांना थकीत महागाई भत्ता

**नवी मुंबई : बातमीदार**



एनएमएमटी श्रमिक सेनेच्या अविरत पाठपुराव्यामुळे नवी मुंबई महापालिका परिवहन सेवा म्हणजेच एनएमएमटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याची थकीत रक्कम प्राप्त झाली आहे.

श्रमिका सेनेच्या माध्यमातून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात १५ दिवसापूर्वी पत्र देण्यात आले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्त नार्वेकर यांनी १० ऑगस्ट रोजी कामगारांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात चर्चा करण्यासाठी श्रमिक सेनेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्यासोबत बैठक घेतली. आयुक्त नार्वेकर यांच्यासोबत डॉ. संजीव नाईक व सरचिटणीस चरण जाधव यांच्या उपस्थितीत आयुक्त महोदयांनी कामगारांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा केली. त्यावेळी त्यांनी कामगारांची आर्थिक थकबाकी लवकरच देण्याचे मान्य केले. त्या अनुसार शुक्रवारी दि. ११) कामगारांच्या खात्यावर १ जानेवारी २०२३ ते ३१ मे २०२३ या कालावधीतील कामगारांच्या महागाई भत्त्याची रक्कम ७२ लाख रुपये लगेच जमा करण्यात आली.

याबद्दल परिवहन सेवेच्या कामगारांनी लोकनेते आमदार गणेश नाईक, श्रमिक सेनेचे अध्यक्ष डॉ. संजीव नाईक, उपाध्यक्ष संदीप नाईक, उपाध्यक्ष सागर नाईक यांचे आभार व्यक्त केले आहेत. आयुक्तांसमवेत झालेल्या बैठकीस डॉक्टर संजीव नाईक यांच्या समवेत श्रमिक सेनेचे सरचिटणीस चरण जाधव तसेच संघटनेच्या सेंट्रल कमिटीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या सर्वांचे कामगारांनी आभार व्यक्त केले आहेत. तसेच महापालिका आयुक्त, परिवहन व्यवस्थापक व मुख्य लेखा वित्त अधिकारी यांचे कामगारांनी आभार मानले.

## वावोशीत हप्ता मागणाऱ्यावर गुन्हा

**खोपोली** : वावोशी पोलीस दूरक्षेत्र हद्दीत असलेल्या मॅजिक देशी बारमध्ये हाणामारी करून हप्ता मागणाऱ्या चेतन भरत गरुडककर (रा. वावोशी फाटा, ता.खालापूर) याच्याविरोधात बार व्यवस्थापकाने दिलेल्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चेतनने बारमधील ग्राहकांना धमकी देऊन बारचे सामान बाहेर काढले. कर्मचाऱ्यांना मारहाण करुन गल्ला उघडून त्यातील पाच हजार रुपये घेतले तसेच व्यवस्थापक कृष्णकुमार यांना मला दर महिन्याला पैसे द्यावे लागतील, अशी धमकी दिली.

# महावितरणने ईव्ही चार्जिंग स्टेशनला दिला दोन तासांत वीजपुरवठा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



महावितरणमध्ये सध्या २४ तासांत वीजजोडणी देण्याचे उपक्रम सर्व परिमंडलात सुरू आहेत. त्याप्रमाणेच भांडुप परिमंडलचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी या मोहिमची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार भांडूप परिमंडल व वाशी मंडळ कार्यालयाकडून याबाबत नियमित पाठपुरावा घेण्यात येतो. १० ऑगस्ट रोजी हेमंत हनुमान पाटील (भगवती एम्पिरिया, उलवे) यांनी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगच्या वीज जोडणीसाठी उलवे शाखा कार्यालयास संपर्क साधला व सर्व प्रक्रिया पूर्ण करून दोन तासांत त्यांना वीज जोडणी देण्यात आली.


हेमंत पाटील यांनी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगच्या वीज जोडणीसाठी उलवे शाखा कार्यालयास संपर्क साधला. सहाय्यक अभियंता अमित पवार यांनी महावितरणच्या संकेतस्थळावर असलेल्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मदत केली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर त्वरित कोटेशन देऊन दोन तासांत लाईनमन मयूर आणि लाईनमन संकेत यांनी वीजजोडणी केली. सीबीडी-बेलापूरचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता जयदीप नानोटे यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणनेही कामगिरी पार पाडली व जनमानसात महावितरणची प्रतिमा उंचावली आहे. वाशी मंडळाचे प्रभारी अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांनी त्यांचे कौतुक करून भविष्यात अशीच कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले.

केंद्र व राज्य सरकारच्या धोरणात्मक व प्रोत्साहित असलेल्या इलेक्ट्रिक वाहन

## दुखवटा

### जनार्दन गीध

**मोहोपाडा :** येथील जनार्दन दत्तात्रेय गीध यांचे नुकतचे



निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी (दहावे) शुक्रवारी (दि. १८) सकाळी ९ वाजता श्रीक्षेत्र गुळसुंदे येथे होणार आहेत, तसेच उत्तरकार्य विधी (तेरावे) रविवारी (दि. २०) घरी मोहोपाडा येथे होणार आहे. कै. जनार्दन दत्तात्रेय गीध यांचा सरळ साधा स्वभाव असल्याने ते सर्वांना हवेहवेसे वाटायचे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, असा परिवार आहे.

## चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने को.ए.सो. शालेय संकुलातील के. व्ही. कन्या विद्यालय, व्ही. के. हायस्कूल व इंदूबाई वाजेकर इंग्रजी हायस्कूलमधील पाचवी ते आठवीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

क्लबचे कलाप्रेमी सदस्य योगेंद्र कुरघोडे यांच्या संकल्पनेला कला शिक्षक पांडुरंग नेरुरकर, मुनीर मुल्ला, सुजाता गायकवाड तसेच तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापिका प्रगती दलाल, मनिषा पाटील, वैशाली गावित यांनी पुढाकार घेऊन मार्गदर्शन केले. तिन्ही शाळांतून प्रथम, द्वितीय व तृतीय अशी १८ बक्षिसे स्वातंत्र्य दिनी देण्यात येणार आहेत. या चित्रकला स्पर्धेच्या वेळी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष रतन खरोल, सचिव अनिल खांडेकर, माजी अध्यक्ष संतोष घोडींदे, भगवान पाटील, प्रितम कैया, अनिल ठकेकर, योगेंद्र कुरघोडे, ऋषिकेशबुवा यांच्यासह शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.



# पनवेलच्या ग्रामीण भागात माझी माती, माझा देश अभियान

## कोन ग्रामपंचायतीतर्फे विविध उपक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोन ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या समारोपाच्या निमित्ताने माझी माती, माझा देश अभियानांतर्गत ग्रामपंचायत हद्दीत शनिवारी (दि. १२) विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यास ग्रामस्थांचा प्रतिसाद लाभला.

ग्रामपंचायतीच्या वतीने कोन गावात मशाल फेरी काढण्यात आली. स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामपंचायत सभागृहात मातीचे दिवे हातात घेऊन पंच प्रण शपथ घेण्यात आली, तर अजिवली गावात स्वातंत्र्यसैनिकांचा नामोल्लेख असलेल्या शिलाफलकाचे अनावरण, स्वातंत्र्यसैनिक व वीरांना वंदन तसेच वृक्ष लागवड करण्यात आली.



या कार्यक्रमांना भाजप महिला मोर्चा पनवेल तालुका सरचिटणीस शिल्पा म्हात्रे, कोन ग्रामपंचायत सदस्य आशा घरत, अजिवली ग्रामपंचायत सदस्य दीपक कांबळे, सुलोचना भागित, तसेच ज्ञानेश्वर भागित, आशा वर्कर वनिताताई, सुषमा भागित, ग्रामसेवक रमेश तारेकर, प्रशांत म्हात्रे, कर्मचारी अमोल केदारी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवकर ग्रामपंचायत हद्दीतही निरनिराळे कार्यक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या समारोपानिमित्ताने देशभरात माझी माती, माझा देश अभियान राबविले जात आहे. या अभियानांतर्गत पनवेल तालुक्यातील शिवकर ग्रामपंचायतीच्या वतीने केंद्र आणि राज्य शासनाच्या आदेशानुसार शनिवारी (दि. १२) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शिलाफलकाचे उद्घाटन, ध्वाजारोहण, स्वातंत्र्यसैनिक वीरांना वंदन, पंचप्राण शपथ वसुधा वंदन तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे कार्यक्रम झाले. या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, ग्रामपंचायत सदस्य प्रांजल ढवळे, रितु पाटील, मोनिका पोपेटा, संतोष मते, मनिषा ढवळे, सुरेखा टोपले, रविंद्र ढवळे, मंगेश ढवळे, रेश्मा पाटील, जगदीश ढवळे, किर्ती ढवळे, सुगंधा ढवळे, चंद्रा पाटील तुकाराम पाटील दिलीप ढवळे, शालिक पाटील, अरविंद माळी, बळीराम भोईर, अमित पाटील, अक्षय पाटील, ग्रामसेवक दीपक कोंडिलकर, वामन ढवळे, गोटीराम ढवळे, भास्कर पाटील, चंद्रकांत ढवळे, पोलीस पाटील मिलींद पोपेटा, गोपाळ पाटील, सुरेश ढवळे, आरती पाटील, रिया ढवळे, अदिती तुपे, मंजुळा भगत, सखाराम चौधरी, गणेश भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## कामोठ्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दुकानाचे उद्घाटन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठ्याची शोभा आणि नावलौकीक वाढत असताना डिजी वन स्टोअरच्या माध्यमातून या नावलौकीकामध्ये आणखी भर पडेल, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी डिजी वन स्टोअरच्या उद्घाटनावेळी केले.

कामोठे परिसरात वाढते नागरीकणामुळे विविध व्यवसायांना चालना मिळत आहे. त्यापार्श्वभुमीवर हरीष मुलचंदाणी आणि अमित मुलचंदाणी यांनीडिजी वन हे इंलेक्ट्रीस स्टोअर सुरू केले आहे. या स्टोअरचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १२) उद्घाटन झाले. या वेळी त्यांनी डीजी वनच्या माध्यमातून नागरीकांना चांगली सेवा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्यासह



माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, दिलीप पाटील, माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते भाऊ भगत, महेंद्र भोपी, व्यापारी सेलचे अध्यक्ष नान मगदूम, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, नारायण पोपेट, रावसाहेब बुधे, उत्तम जाधव, अमोल जाधव, हरीचंद्र जोशी, डॉ. संतोष आगलावे, रविराज गाडवे, काकासोह कुत्तरवडे, विनोद खेडकर, महिला मोर्चाच्या कामोठे शहर अध्यक्ष वनिता पाटील, शरद जगताप, दामोदर चव्हाण आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची टाटा मेमोरियल हॉस्पिटलला भेट




**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शनिवारी (दि. १२) सकाळी ११ वाजता खारघर येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल व संशोधन केंद्राला भेट दिली.

या भेटीचा प्रमुख उद्देश विद्यार्थी व विद्यार्थिनींना भौतिकशास्त्राचा आरोग्यक्षेत्रात कश्याप्रकारे उपयोग होतो, कर्करोगाचे निदान करताना भौतिकशास्त्राचा किती मोलाचा वाटा आहे याबद्दल माहिती मिळावी हा होता. या भेटीमध्ये द्वितीय व तृतीय वर्षातील सुमारे २० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी सहभाग घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या भेटीसाठी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले तसेच शुभेच्छा दिल्या. या भेटीचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर (भौतिकशास्त्र विभाग) यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश उदेकर यांनी सहकार्य केले.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर व विचुंबे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या माध्यमातून माऊली सोसायटी मुख्य रस्ता व अंतर्गत खड्डे बुजवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.**

## शिवकर-पाली खुर्द रस्त्यासाठी भाजपकडून अभियंत्यांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वतीने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत शिवकर ते पाली खुर्द रस्त्याच्या कामाची निविदा मंजूर झाली आहे. या कामाला तातडीने सुरुवात करण्यासाठी कार्यारंभ आदेश लवकरात लवकर मिळावे, अशी मागणी भाजप लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे अभियंता योगेश पाटील यांच्याकडे केली आहे.

माजी जि.प. सदस्य अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विचुंबे



पंचायत समिती अध्यक्ष सतीश मालुसरे, वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रवीण म्हात्रे यांनी रस्त्याची पाहणी करून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे अभियंता पाटील व कॉन्ट्रॅक्टर श्री. खारपाटील यांना या रस्त्याचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी निवेदन दिले.

सन २०२२-२३ वर्षामध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत एनएच ४ ते उसली खुर्द-शिवकर-मोहो-मोहोचापाडा-पाली खुर्द रस्ता तयार करणे या रस्त्याच्या कामाला अंदाजे दोन कोटी रुपये निधी मंजूर झाला असून कामाच्या निविदाही मंजूर झाल्या आहेत, परंतु निविदा मंजूर होऊन बराच कालावधी झाला असून कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) देण्यात आले नसल्याने या रस्त्याच्या कामाला अद्याप सुरूवात होऊ शकलेली नाही. सद्यस्थितीत या रस्त्याची अतिशय दयनिय अवस्था झाली असून खड्ड्यांमुळे वाहनचालक व नागरिकांना वाहतूक करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या मंजूर कामाला तातडीने सुरुवात करण्यासाठी कार्यारंभ आदेश लवकरात लवकर मिळण्याकरिता संबंधितांना आदेश व्हावेत, असे माजी जि.प. सदस्य अमित जाधव यांच्या सहीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### सकारात्मक प्रतिसाद

*यावर सकारात्मक प्रतिसाद देत दोन ते चार दिवसांत काम चालू करणार आहोत, असे कॉन्ट्रॅक्टर खारपाटील यांनी सांगितले. कार्यभार आदेश आला नसल्याने तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजवून नागरिकांना दिलासा देण्याचे काम करण्यात येणार आहे.*

## उलव्यातील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात बाह्यतज्ञ मार्गदर्शन उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात शनिवारी (दि. १२) सेवा सहयोग फाउंडेशन मुंबईच्या वतीने बाह्यतज्ञ मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुकुल विभागाअंतर्गत या विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध प्रकल्प विद्यार्थ्यांसाठी राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून सेवासहयोग फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, विज्ञानाची जिज्ञासा, आवड निर्माण व्हावी या हेतूने अभ्यासक्रमातील विविध प्रयोग आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेला चालना देणारे संशोधनात्मक




प्रयोग यांचे मार्गदर्शन सेवा संयोग फाउंडेशनच्या सदस्या जयश्री सानप, लक्ष्मी माळी व गणेश संसारे यांनी केले.

या वेळी विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन शरद खारकर, मुख्याध्यापक डी. जी. हजारे, रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, विज्ञान विषयाच्या शिक्षिका व्ही. व्ही.गावंड या उपस्थित होत्या. फाउंडेशनने विविध उपक्रमांमध्ये शाळेचा सहभाग घ्यावा अशी अपेक्षा मुख्याध्यापक डी. जी. हजारे सर यांनी आपल्या मनोगतातुन व्यक्त केली. ज्योत्स्ना ठाकूर यांनी गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी सेवाभावी संस्थेमार्फत सहाय्य मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांनी सहयोग फाउंडेशन या सेवाभावी संस्थेचे आभार व्यक्त करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या संस्थेसाठी विद्यालय सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्याने आपल्या अध्यक्षीय मनोगतातून दिली.

या वेळी जयश्री सानप यांनी एन. एम. एम. एस. स्कॉलरशिप मध्ये बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा फी सेवा सहयोग फाउंडेशन मार्फत दिली जाईल असे जाहीर केले. तसेच आठवी ते दहावी अभ्यासक्रमातील प्रत्येक प्रयोग करता येईल, असे प्रयोगाचे साहित्य असणारे किट विद्यालयाला दिले.

## उरणमध्ये भाजपची आज आढावा बैठक

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण भाजप जासई विभाग मंडळाच्या वतीने पक्ष संघटनात्मक चर्चा आणि आढावा बैठकीचे आयोजन रविवारी (दि. १३) सकाळी ९.३० वाजता करण्यात आले आहे.

उरण द्रोणागिरी येथील भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात होणाऱ्या या बैठकीला आमदार महेश बालदी मार्गदर्शन म्हणून असणार आहेत. या वेळी जासई विभागातील सर्व पदाधिकारी, बूथ अध्यक्ष, गाव अध्यक्ष, शक्तिकेंद्र प्रमुख, सर्व महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या, सर्व युवा पदाधिकारी आणि कार्यकर्ते, जासई विभागातील सर्व कार्यकर्ते वेळेवर व पूर्णवेळ उपस्थित रहावे, असे आवाहन भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर यांनी केले आहे.

## 'सीकेटी'मध्ये महिला सुरक्षा, रेल्वे सुरक्षा जनजागृती अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालय आणि चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ११) महिला सुरक्षा व रेल्वे सुरक्षा संदर्भात जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

या वेळी लोहमार्गचे सहाय्यक पोलीस आयुक्त देविदास सोनवणे, भोजलिंग दौंड मिसे, अजित कणसे, पोलीस अंमलदार सारिका बोराटे व त्यांचे सहकारी उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने प्राचार्य प्रशांत मोरे, कला व वाणिज्य शाखा पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान शाखा पर्यवेक्षिका स्वाती पाटील व महिला शिक्षिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

संस्थेचे सचिव एस. टी. गडदे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविक उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी केले. सहाय्यक पोलीस आयुक्त देवीदास सोनवणे यांनी उपस्थितांना सुरक्षा संदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले व रेल्वे सुरक्षा संदर्भातही जनजागृती घडवून आणली. भोजलिंग दौंडमेसे व अजित कणसे यांनीही सुरक्षा संदर्भात महिलांचे प्रबोधन केले तसेच सारिका बोराटे, महिला पोलीस अंमलदार यांनीही सुरक्षा संदर्भात महिला शिक्षिका व विद्यार्थ्यीनींमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका आदिती धर्माधिकारी यांनी केले तर आभार लोहमार्ग पोलीस अंमलदार अमर पाटील यांनी मानले.



# एक होती श्रीदेवी...

जितेंद्र व रेखा दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटाच्या हिंदीतील मांग भरो सजना, दिल और दीवार इत्यादी रिमेकमध्ये भूमिका साकारत असतानाची गोष्ट.

सेटवरच्या मधल्या वेळात रेखा जितेंद्रला स्थानिक गॉसिप्स मॅगझिनमधील फोटो दाखवून चिडवायची, रवी...रवी (जितेंद्रचे मूळ नाव) या मुलीसोबत काम कर. ती श्रीदेवी होती. भारती राजा दिग्दर्शित 'सोलवा सावन' (१९७८) या चित्रपटातून ती हिंदीत नायिका म्हणून आली होती. अमोल पालेकर त्यात नायक होते, पण पिक्चर फ्लॉप झाल्याने ती तेलगू, तमिळ चित्रपटात बिझी राहिली.

जितेंद्र 'रेखाचे बोल' ऐकून एन्जॉय करायचा. अशातच दिग्दर्शक के. राघवेंद्र राव यांनी एका मसालेदार मनोरंजक तेलगू चित्रपटाच्या रिमेकची जितेंद्रकडे कल्पना मांडली. त्यात जयाप्रदा होती. जितेंद्रने राघवेंद्र रावला सांगितले, श्रीदेवीला नायिका करु.

...आणि श्रीदेवीने 'हिम्मतवाला' (१९८३) मध्ये ता... थय्या....ता थय्या करीत अशी काही बहारदार नृत्य साकारले. ती 'हिम्मतवाली' ठरली. पिक्चर सुपर हिट (मुंबईत गिरगावातील सेन्ट्रल थिएटरला पंचवीस आठवड्यांचा मुक्काम) आणि अशा हिट पिक्चरमधील श्रीदेवीला साईन करण्यासाठी आता हिंदीतील निर्माते व दिग्दर्शक यांचा उत्साह वाढला. सगळ्याना असे चलनी नाणं हवेच असते. गंमत म्हणजे, 'हिम्मतवाला'मध्ये श्रीदेवीच्या व्यक्तीरेखेचे नाव आहे, 'रेखा'.

खुद्द जितेंद्रनेच एका मुलाखतीत हा किस्सा सांगितलाय. असाच एक किस्सा ऋषि कपूरने अशाच एका मुलाखतीत सांगितलाय. हरमेश मल्होत्रा दिग्दर्शित 'नगिना' (१९८६) च्या आर. के. स्टुडिओतील शूटिंगच्या वेळचा. ऋषि कपूर काय आणि श्रीदेवी काय, सेटवर उगाच अघळपघळ बोलत राहत नसत. तसे ते मितभाषी. एका दृश्यासाठी ते कॅमेरासमोर उभे राहिले. तेवढ्यात कॅमेरात काही काम निघाले. मोजक्याच तीन चार मिनिटांचे काम असल्याने चिंटू व श्री आपल्या जागेवरच उभे राहिले. लाईट्स ऑफ झाले होते. तेवढ्यात



श्री अगदी हळू आवाजात चिंटूला म्हणाली, मी 'बॉबी ' दोन तीनदा एन्जॉय केला. असं अगदीच अनपेक्षित ऐकायला मिळताच चिंटू सुखावला आणि तो काही बोलणार तोच लाईट्स आली, शूटिंग सुरु झाले.

निर्माता बोनी कपूरने श्रीसोबत लग्न करण्यापूर्वी त्याने निर्मिलेल्या शेखर कपूर दिग्दर्शित 'मिस्टर इंडिया' (१९८७)मध्ये श्रीने हवाहवाई असं बेभान बेफाम नाचून जणू 'मिसेस इंडिया' असं यश प्राप्त केले होते. श्रीची कार्यशैली, तिच्या अटी, शर्ती (जर काही कटकटी असतील तर त्याही), व्यवहार, तिच्यासोबत सतत तिची आई असते हे सगळेच बोनी कपूरला माहित होते. म्हणूनच दिग्दर्शक यश चोप्रा यांना 'चांदनी'च्या भूमिकेसाठी श्रीच परफेक्ट आहे असं वाटलं तेव्हा त्यांनी बोनी कपूरच्या माध्यमातून श्रीशी संवाद साधायचं ठरवलं. तेव्हा ती चैन्नईत (तेव्हाचे मद्रास) शूटिंग करत होती. यशजी आणि बोनी कपूर चैन्नईत गेले. तेव्हा श्रीपेक्षा तिच्या आईशी जास्त संवाद साधणे आवश्यक आहे हे यशजींच्या लक्षात आले. यशजींच्या वाटचाल, खासियत, शैली यांच्याशी या आई मुलीला फारसं घेणे-देणे नव्हते. त्यांनी मेहनताना किती मिळणार याला महत्व दिले. यशजींच्या मनात 'चांदनी' नाव त्यांच्या 'दाग' ( १९७३) पासूनच होते. त्यात राखीचं नाव 'चांदनी' आहे. यशजींच्या 'सिलसिला' (१९८१) मध्ये रेखाचे नाव चांदनी आहे. यशजींच्या कल्पक, संवेदनशील दिग्दर्शकाच्या मास्टर माईंडमध्ये 'चांदनी' फिट्ट होती आणि श्रीच ती व्यक्तिरेखा रंगवू, खुलवू शकते असा यशजींना विश्वास होता. म्हणून तर त्यांनी कितीही 'मानधन' असले तरी श्रीला साईन केले. खरी गंमत, श्रीसाठी कपड्यांची खरेदी करताना झाली. यातही 'दिग्दर्शक दिसतो'. यशजींनी मोठ्याच प्रमाणावर सफेद रंगाचे कपडे खरेदी करण्यावर भर दिल्याचे श्रीच्या आईला खटकले. दक्षिण भारतात सफेद कपडे अशुभ मानतात असं श्रीच्या आईने म्हटलं, त्यावर यशजींनी अशी रंगसंगती पडद्यावर कशी खुलेल आणि 'चांदनी'ची व्यक्तीरेखा बहारदार ठरले हे समजून सांगितले आणि तेच योग्य ठरले.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मला आजही 'चांदनी'चा मेट्रो थिएटरमधील भव्य दिमाखदार प्रीमियर शो आठवतोय. मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांना यशराज फिल्मच्या वतीने आमंत्रित करण्यात आले होते. प्रीमियरला ऋषी कपूर, विनोद खन्ना यांच्यापेक्षा श्रीदेवी जास्त लक्षवेधक होती. मध्यंतराला यशजींनी सगळ्याना स्टेजवर आमंत्रित केले असता कसलीही घाई गडबड न करता श्री सर्वांसमोर आली. उगाच भाषणबाजी नसल्याने प्रत्येकाचे अस्तित्व जास्त जाणवत होते.

चित्रपटाच्या सेटवरची श्री अनुभवणे म्हणजे वेगळाच बोनस. एसेल स्टुडिओत रवि टंडन दिग्दर्शित 'नजराना' (१९८७)च्या शूटिंग रिपोर्टींगसाठी आम्हा सिनेपत्रकारांना आमंत्रित केले असता मला मानखुर्दला कधी पोहचतोय असं झालं. कारण सेटवर राजेश खन्ना, स्मिता पाटील व श्री असे तगडे कलाकार. कोर्ट रुम ड्रामाचं शूटिंग होते. असं दृश्य म्हणजे हमखास कंटाळाच हे घट्ट समीकरण. येथे मात्र उत्सुकता होती. अभिनयाचा तगडा मुकाबला प्रत्यक्षात अनुभवता येत होता. नशीब म्हणतात ते हेच असावे. तिघांचीही सेटवर वावरण्याची पध्दत भिन्न. राजेश खन्ना आपलं दृश्य झाल्यावर सेटबाहेर मोकळ्या जागेत येऊन बसणार. स्मिता पाटील अंतर्मुख होणार आणि श्री सेटच्या एका कोपर्यात पंख्याचा वारा घेत आईसोबत बसणार.

मेहबूब स्टुडिओत महेश भट्ट दिग्दर्शित 'गुमराह' (१९९३) सेटवर निर्माता यश जोहरने आम्हा सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टींग व्यवस्थित करता येईल अशा पध्दतीने बसायची व्यवस्था केली असता श्रीची मुलाखत घ्यायचा विचार केला आणि तसं श्रीला विचारताच तिने म्हटलं, मम्मीसे पुछो...कालांतराने बोनी कपूरशी तिचं लग्न झाल्यावर ती म्हणायची बोनी से पुछो. अर्थात, 'भेटला पत्रकार दे मुलाखत' असा उदारपणा त्या काळात नव्हताच आणि श्री मुलाखत देण्यास फारशी इच्छुक नसे. अशा वेळी तिचं सेटवर म्हणा, प्रीमियरला म्हणा, पार्टीत म्हणा तिचं असणं अनुभवावे. त्यातही वेगळा आनंद आहे असे लक्षात आले.

रमेश सिप्पी दिग्दर्शित तिच्या दोन चित्रपटांचे मुहूर्त आजही लक्षात आहेत. ते दोन्ही चित्रपट मुहूर्तानंतर बंद पडले. एक चित्रपट होता, 'जमीन'. जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये मुहूर्ताची जंगी पार्टी रंगली. विनोद खन्ना, श्रीदेवी आणि माधुरी दीक्षित अशी स्टार कास्ट. माधुरीचे ते सुरुवातीचे दिवस होते. यशासाठी धडपडत होती. श्री स्टार होती. असाच एक चित्रपट रमेश सिप्पी दिग्दर्शित 'राम की गीता श्याम की सीता. अंधेरीतील नटराज स्टुडिओ हा मुहूर्त भारीच धमाकेदार झाला. अमिताभ व श्री या दोघांचाही डबल रोल अशी गंमत.

अनेक चित्रपट बंद पडत असले तरी असे काही चित्रपट पडद्यावर आले असते तर? श्री व माधुरी एकाच चित्रपटात हा सुखद योग दिसला असता. पंकज पराशर दिग्दर्शित 'चालबाज' (१९८९) श्रीच्या करियरचा सर्वोच्च बिंदू. 'सीता और गीता'ची रिमेक (तो 'राम और श्याम'ची रिमेक) अर्थात डबल रोल. एक भित्री (जी रसिकांची सहानुभूती मिळवते), दुसरी हंटरवाली डेरिंगबाज (जी पब्लिकच्या हमखास टाळ्या आणि शिट्या वसूल करते.) या चतुरस्त्र अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कारासाठी विचार व्हायला हवा होता, पण अशा मसालेदार मनोरंजक चित्रपटातील अभिनयाला फारसं सिरियसली घेतले जात नाही. यश चोप्रा दिग्दर्शित 'लम्हे'(१९९१) व मुकुल आनंद दिग्दर्शित 'खुदा गवाह' (१९९२) या दोन्हीत डबल रोल. म्हणजेच भूमिकेत विविधता आणि श्री एकदम फॉर्मात. काय रेंज होती हो श्रीची. बालू महिन्द्रु दिग्दर्शित 'सदमा' (१९८३)ची श्री द बेस्ट.

जान्हवी व खुशी या दोन मुली वयात येत असताना श्रीने गौरी शिंदे दिग्दर्शित 'इंग्लिश विंग्लीश' (२०१२) या चित्रपटातून पुनरागमन करताना आपल्यातील अभिनय स्पार्क दाखवलाच, पण मला आठवतय, जुहूच्या एका मल्टीप्लेक्समध्ये या चित्रपटाच्या पत्रकार परिषदेत श्रीचा फिटनेस सर्वांचाच कौतुकाचा विषय होता. ती पन्नाशीत आहे हे खरंच वाटू नये अशी ती होती. आपल्या कारकिर्दीतील सेकंड इनिंगमध्ये एकदम फिट्ट असणे आणि अभिनयाला (मॉम चित्रपट) यांची केमिस्ट्री छान साध्य केली.

अशातच २४ फेब्रुवारी १९१८ च्या रात्री उशिरा मोबाईलची रिंग वाजली म्हणून डोळे चोळत ऐकू लागलो, दुबईत श्रीदेवीचे निधन... प्रचंड धक्कादायक, अनाकलनीय आणि गूढ शेवट. तो मृत्यू नैसर्गिक की ती हत्या याच उत्तर कधीच मिळणार नाही हे स्पष्ट आहे.

**आज (१३ ऑगस्ट १९६३चा जन्म दिवस) श्रीने साठीत प्रवेश केला असता...**

---

# महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्व आचार्य अत्रे



यंदा आपण आचार्य अत्रे यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष साजरे करीत आहोत. अत्रे हे खरे तर चालती बोलती सरस्वतीच! त्यांनी मराठी भाषा आपल्या लेखणीने एका वेगळ्या शैलीने सुंदर केली.

आपल्या महाराष्ट्रीय नव्या पिढीला आंदोलनांचा जो वारसा लाभला, तो बहुअंगी दमदार नवी दृष्टी देणारा आहे. आचार्य अत्रे अशा थोर सेवकांपैकी एक. झेंडूची फुले हे उत्तम मराठी विडंबन कवितांजली लिहिली, कर्मकांडाचे स्तोम माजवणाऱ्यांची पंचाईत करणारे साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा सारखे नाटक लिहिले. मराठातील अग्रलेख गाजले, पत्रकार म्हणून संयुक्त महाराष्ट्राची चळवळीत लोकजागृती यशस्वीपणे केली. श्यामची आई द्वारे साने गुरुजींना घराघरात पोहोचविले. महात्मा फुले हा विलक्षण चित्रपट निर्माण करून तो काळ जिवंत करून महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाईचें कार्य सर्वांना निकोप रीतीने समजावले. वस्त्रहरण करून दांभिक नेत्यांवर सडेतोड टीका केली. नंतर त्यांच्यावर त्यांनी हृदयस्पर्शी विस्तृत मृत्यूलेखमालाही लिहिल्या. चतुरस्त्र बुद्धिमत्ता, प्रतिभा आणि बहुरंगी व्यक्तिमत्त्व लाभलेला सुपुत्र महाराष्ट्राला लाभला. अत्रे यांची लेखणी आणि वाणी यात श्रेष्ठ कोण हे सांगणे कठीण आहे. महाराष्ट्र हा त्यांचा श्वास होता. हशा आणि टाळ्यांचे ते बादशहा होते. दोन्ही शस्त्रे त्यांनी हवी तशी वापरली. अत्रे यांनी स्वतःच निर्माण केलेल्या कालखंडाचा ठसा पुसता येणार नाही यानिमित्ताने त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

एकोणविसावे शतक अस्ताला जाताना म्हणजे १३ ऑगस्ट १८९८ रोजी महाराष्ट्राच्या क्षितिजावर विसाव्या शतकात अनेक क्षेत्रात तेजाने तळपत राहणाऱ्या एका महान महाराष्ट्र सुपुत्राचा जन्म झाला. विद्वतेची कवचकुंडले जन्मताच घेऊन ल्यालेल्या या सुपुत्राच्या जीवनाची अखेर १३ जून १९६९ रोजी झाली. महाराष्ट्रातील एक अजस्त्र शक्ती लोप पावली तेव्हा मराठीजणांच्या तोंडून उस्फुर्त शब्द निघाले.....दहा हजार वर्षात असा महापुरुष जन्माला नाही अन जन्मणार सुद्धा नाही. त्या व्यक्तीचे नाव म्हणजे आचार्य प्रल्हाद केशव तथा प्र. के. अत्रे. अत्र्यांनी आपल्या झंझावाती व सर्वस्पर्शी आयुष्यात विविध क्षेत्रात केलेल्या डोंगराएव्हढ्या कामगिरीमुळेच यावर्षी त्यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष साजरे करताना महाराष्ट्र त्यांचे गुणगान करणार आहे. ऐन उमेदीच्या काळात दबकत दचकत कवी म्हणून महाराष्ट्र सारस्वतांच्या दरबारात वळचणीला का होईना पण कशीबशी जागा मिळवणारे अत्रे त्यानंतर आपल्या अंगच्या अचाट पराक्रमाने विडंबनकार, शिक्षणतज्ज्ञ, नाटककार, विनोदीवक्ता वक्ता, चित्रपटकथा लेखक, राष्ट्रपती पदक विजेता चित्रनिर्माता, सव्यसाची पत्रकार, महानगर पालिका आणि विधानसभेत लोकांचे प्रश्न सडेतोडपणे मांडणारा लोकप्रतिनिधी, लोकप्रिय वर्तमानपत्राचा संपादक, महाराष्ट्राला मुंबई मिळवून देण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अग्रणी राहून नेतृत्व करणारा झुंजार नेता. अशा एकामागून एक कर्तृत्वाची थोर दालने सहजगत्या सर करीत महाराष्ट्र मंडळीत आपला असा काही ठसा उमटवीते झाले की, गेल्या शतकाचा इतिहास लिहिताना इतिहासकारांना पदोपदी त्यांना मानाचा मुजरा करणे भागच पडते. हुतात्म्यांच्या बलिदानातून, असंख्यांच्या त्यागातून, सेनापती बापट, एस. एम. जोशी , कॉम्रेड डांगे, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या समर्थ नेत्यांच्या तेजस्वी लढ्यातून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. परंतु या नेत्यांनी उभ्या केलेल्या लढ्याला विराट स्वरूप प्राप्ती झाले ते आचार्य अत्रे यांच्यामुळेच असे यथार्थ वर्णन महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी एकदा केले त्याची प्रचिती संयुक्त महाराष्ट्र लढ्यात आचार्य अत्रे यांनी 'मराठा' दैनिकाची रणभेरी वाजविली तेव्हा आली. दैनिक मराठा रणांगणावर, लाखोंच्या लोकसमुदायात जन्माला आले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अनेक नामवंत नेत्यांचा जसा सहभाग होता तसेच अनेक अनामिक कार्यकर्त्यांचे योगदान होते. यांनी महाराष्ट्राला मुंबई मिळवून तर दिलीच, पण भारताच्या नकाशावर 'महाराष्ट्र' हे नाव जे आलं ते केवळ आचार्य अत्रेंच्या शक्तीमुळे, नावामुळे व दबदब्यामुळेच !

'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या घोषणेत 'च' आणला तो आचार्य अत्रे यांनी आणि म्हणून 'च'चा आग्रह कशाला असे म्हणणाऱ्या यशवंतराव चव्हाणांना आपल्या नावातील 'च'काढून टाकला तर काय होईल ते पहा असे सुनावले ते आचार्य अत्रे यांनी. शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्य स्थापन केली तेव्हा 'हर हर महादेव' ही मराठ्यांची युद्धघोषणा होती, तशी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात 'झालाच पाहिजे' ही मराठी जनतेची रणगर्जना झालेली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांनी यशवंतराव चव्हाण यांना धारेवर धरले होते, पण त्यांना केंद्र सरकारने संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत बोलावले तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी जे भाषण आचार्यांनी केले ते वाचले म्हणजे त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. ते आपल्या भाषणात म्हणाले, आमदार यशवंतरावांच्या अंगी काही अलौकिक गुण नसते तर ते या पदाला पोहचलेच नसते. आणि पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना अडचणीच्या काळात भारताचे संरक्षणमंत्री म्हणून पाचारण केले नसते. त्यांचा स्वभाव, त्यांचे वागणे आणि बोलणे हे सारे काही असे आहे की त्यांचे शत्रुत्व करु इच्छिणाऱ्या माणसाला सुद्धा यशस्वीपणे फार काळ शत्रुत्व करणे शक्य होत नाही असे मी माझ्या अनुभवावरून सांगतो.

तमाम मराठी जनांच्या मनातील स्पंदने, हेलकावे, भावभावना, राग-द्वेष या साऱ्या छटा आचार्य अत्रे यांच्या लिखातून बाहेर पडतात आचार्य अत्रे म्हणजे महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजे आचार्य अत्रे असे समीकरण होते. सर्वत्र संचार असल्याने सर्वांना आचार्य अत्रे आपले वाटत; कारण ते आपल्या मनातले बोलतात असे जनतेला वाटे. सारांश काय तर सारा महाराष्ट्र आचार्य अत्रे यांनी पालथा घातला, सारा महाराष्ट्र पिंजून काढला; त्यामुळे सर्वत्र सभा, प्रबोधन, परिवर्तनाचा नारा आणि अन्यायाविरुद्ध लढा यांची प्रेरणा सातत्याने मिळत गेली. मराठी माणसाला न्यायाची 'चाड' आणि अन्यायाची 'चीड' आहे. तितकी इतर प्रांतातील जनतेला नाही. असे ते मराठी माणसाचे वेगळेपण सांगताना नेहमी म्हणत असत. 'चांदया'पासून 'बांदया'पर्यंत या शब्दप्रणालीचे प्रवर्तकच आचार्य अत्रे !


अत्रे नुसते महाराष्ट्र धर्माचा जयजयकार करून थांबले नाहीत तर त्या धर्माची सरिता या विसाव्या शतकातील बहुरंगी जीवनाच्या अनेक दालनातून फिरवत पुढे नेण्याचे श्रेय निश्चितपणे त्यांच्याकडे जावे. अत्र्यांनी अनेक क्षेत्रात मिळविलेले विजय प्रचंड होते. त्याचप्रमाणे त्यांनी पत्करलेले पराभवही तेवढेच प्रचंड होते. जीवनाबद्दलचे त्यांचे कुतूहल कधीच संपले नाही. आणि म्हणूनच जीवनाचे प्रत्येक अंग हे एक आव्हान समजून त्यांनी त्यात बेदरकारपणे प्रवेश केला. आपल्या पराक्रमाने त्यांनी त्या त्या जीवनांगाचा पूर्ण आस्वाद अन उपभोग घेतला. आणि प्रत्येक वेळी एखाद्या अनासक्त योग्याप्रमाणे ते त्या जीवनांगातून सहजतेने मुक्त झाले. कशातही अडकून पडले नाहीत. राकट देशा - कणखर देशा असे महाराष्ट्राचे पूर्ण प्रतिबिंब लोकांनी आचार्य अत्र्यांच्या व्यक्तिमत्वात पहिले होते. आचार्य अत्रे नसते तर 'मराठा' दैनिक जन्माला आले नसते. आणि पुढे संयुक्त महाराष्ट्र झाला नसता. एका दैनिकाने 'मराठाने' आपल्या मातृभाषेचे एक राज्य निर्माण केले ही इतिहासातील एकमेव घटना. म्हणूनच त्यांना शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त मानवंदना !

महाराष्ट्रप्रेम, महाराष्ट्राचा अभिमान, मराठी बाणा, मराठीपण आणि मराठी अस्मिताच त्यांच्या जीवनातून, लिखाणातून, भाषणातून प्रदर्शित होते. मराठी माणूस, मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी माती हीच त्यांची चतु:सूत्री होती. आचार्य अत्रेंसारखी भ्रमंती, वाचनातले सातत्य, सततचे लिखाण, सारखी बडबड, सारखी व्याख्याने, सतत वाङ्मयीन व्यग्रता, सारखे चिंतन, मनन, एखाद्या तपस्वी सारखे ऋषितुल्य जीवन व्यतीत केले या महापुरुषाने. आचार्य अत्रे या एकाच प्रचंड माणसात १९२५ ते ४० या काळात दहा अलौकिक अत्रे सामावलेले होते.

साहित्याला लोककल्याणकारी स्पर्श हवा असा आग्रह धरीत राहिले. दुष्ट रूढी, दांभिकपणा, अन्याय यावर सतत घणाघाती हल्ले चढवले. प्रसिद्ध-अप्रसिद्ध, लहान-थोर गुणिजनांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. समाजसुधारकांच्या आणि दिनदुबळ्यांच्या पाठीशी कायमचे उभे राहिले. २०२३ साल हे महाराष्ट्राचे लाडके 'प्रचंड पुरुष' आचार्य अत्रे यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्ष आहे. यानिमित्ताने महाराष्ट्रभर साजेसे अनेक छोटे मोठे कार्यक्रम सर्वत्र होत आहेत. अत्र्यांएवढी अफाट आणि अबाधित लोकप्रियता स्वातंत्र्योत्तर काळात कुणाही मराठी साहित्यिकाला लाभली नाही याचे हे द्योतक आहे.

**-रवींद्र मालुसरे,**
**अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**

# कार्यक्षम राज्यकर्त्या अहिल्यादेवी होळकर



एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्यादेवी होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा बीड) माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्यादेवींचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले. आज अहिल्यादेवी होळकर यांचा स्मृतीदिन. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी...

खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते; खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्यादेवींनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्यादेवींवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्यादेवींना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले, प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे.

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्यादेवी होळकरत्यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्यादेवींवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली, तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. अहिल्यादेवी आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्यादेवी होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्यादेवींविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले.

अहिल्यादेवींना हे कळले तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबादादास कळविले. राघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडून हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी शेवटी राघोबांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्यादेवींनी इंदुरात केला. अशा रीतीने बाईंच्या लौकिकात आणखीच भर पडली.

अहिल्यादेवींच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकीक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, जो कोणी चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील, त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लाविला जाईल. त्यावेळी जातपात बघितली जाणार नाही. हा अलौलिक विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला.

अहिल्यादेवी एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. बाईंनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामेया ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमीबाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.

अहिल्यादेवींचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला, तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली.

अहिल्यादेवींच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या, पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले. महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.

**(साभार : विकासपीडिया)**

## कला दिग्दर्शक नितीन देसाई आत्महत्या प्रकरण

# ‘ईसीएल’च्या अधिकाऱ्यांची पुन्हा चौकशी

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांच्या आत्महत्येप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात दाखल असणाऱ्या गुन्ह्यासंदर्भात ईसीएल कंपनीच्या चार अधिकाऱ्यांची शुक्रवारी (दि. ११) पुन्हा चौकशी करण्यात आली.

नितीन देसाई यांनी २ ऑगस्ट रोजी गळफास घेऊन त्यांच्या चौकजवळील एनडी स्टुडिओमध्ये आत्महत्या केली होती. या प्रकरणी ईसीएल फायनान्स कंपनी व एडलवाईस ग्रुपचे पदाधिकारी यांच्याविरोधात कलम ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन देसाई यांची पत्नी नेहा देसाई यांच्या तक्रारीवरून कर्ज प्रकरणात वारंवार तगादा लावून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर इसीएल कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांना कागदपत्रांसह मंगळवारी हजर राहण्याचे लेखी आदेश दिले होते. यानुसार खालापूर पोलीस ठाण्यात चौकशीची प्रक्रिया अद्याप



सुरू आहे. नितीन देसाई यांच्या आत्महत्येप्रकरणी खालापुर पोलीस ठाण्यात ईसीएल फायनान्स कंपनी व एडलवाईस ग्रुपचे पदाधिकारी यांच्याविरोधात भा. दं. वि. ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा ४ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम हे करीत आहेत. ८ ऑगस्ट रोजी इसीएल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांना नोटीस देवून कागदपत्रांसह हजर राहण्याची समज दिली होती. त्याप्रमाणे ११ ऑगस्ट रोजी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक फणींद्रनाथ काकरला व इतर तीन पदाधिकारी हे कागदपत्रांसह हजर होते.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी हजर केलेल्या कागदपत्रांची तपासणी सकाळी १०.३० ते सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत करण्यात आली. तपासादरम्यान निष्पन्न झालेल्या मुद्यांचे अनुषंगाने अधिक माहिती अथवा कागदपत्रांसह १४ ऑगस्ट रोजी १०.३० वाजता हजर राहणे बाबत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांना नोटीसची बजावणी करण्यात आलेली आहे.

### १८ ऑगस्टला पुढील सुनावणी

*गुन्ह्यातील आरोपींनी उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केलेले आहे. त्याची सुनावणी झाली असुन ही रिट पिटीशनची पुढील सुनावणी मा. न्यायालयाने शुक्रवारी (दि. १८) निश्चित केली आहे.*



**खालापूर : कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांच्या अस्थी कलशाचे विसर्जन एनडी स्टुडिओच्या मागील बाजूने वाहणाऱ्या धावरी नदी पात्रात चौक व हातनोली ग्रामस्थ तसेच कर्मचाऱ्यांनी केले.**

# घोडे उधळल्यामुळे श्रीवर्धनमध्ये अपघात

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये मोकाट गुरे व घोडे यांनी अक्षरशः नागरिकांच्या नाकी नऊ आणले आहेत. रात्रीच्या वेळी गुरे रस्त्यात बसत असल्यामुळे अनेक वेळा दुचाकीस्वरांचे अपघात झालेले आहेत, तर अनेक नागरिकांनाही चारचाकी वाहन घेऊन जातानासुद्धा या मोकाट गुरांचा त्रास होतो.

सकाळच्या सुमारास श्रीवर्धन बाजारपेठेत दोन घोडे उधळल्यामुळे एका दुचाकी स्वराचा अपघात होता होता तो थोडक्यात बचावला आहे. त्याचे सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आले आहेत. आराठी येथे राहणारे अनिल कडू हे श्रीवर्धन बाजारपेठेत खरेदीसाठी आलेले असताना आपल्या दुचाकी वरून जात होते. दोन घोडे अचानक उधळल्याने त्यांचा अपघात होता होता थोडक्यात ते वाचले आहेत. याबाबत अनिल कडू यांनी श्रीवर्धन पोलीस ठाणे व श्रीवर्धन नगर परिषद या ठिकाणी लेखी अर्जदेखील दिला आहे.

मोकाट घोडे व गुरे याबाबत अनेक वेळा बातम्या देऊन सुद्धा प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नसल्याचे पाहायला मिळत आहे. काही नागरिक घोडे पकडून ठेवून घोड्यांच्या मालकांना तुमचा घोडा आहे का? विचारले असता माझा नाही असे सांगणारे अनेक मालक असतात. सर्व घोडे मालक श्रीवर्धन शहराच्या बाहेरील आहेत. त्यांच्याकडे घोडे बांधण्यासाठी कोणत्याही प्रकारचा तबेला अस्तित्वात नाही. दिवसभर समुद्रकिनाऱ्यावरती धंदा करून झाल्यानंतर घोडे मोकाट सोडून द्यायचे नेहमीचे उद्योग झालेले आहेत. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने व पोलीस प्रशासनाने घोडे मालकांवरती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी श्रीवर्धन मधील नागरिकांमधून केली जात आहे.

# माणगाव येथील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव येथील उषःकाल फाऊंडेशन या सेवाभावी संघटनेतर्फे माणगाव तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप नुकतेच करण्यात आले.

उषःकाल फाऊंडेशनचे संस्थापक नामदेव शिंदे हे दरवर्षी तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करीत असते. उषःकाल फाऊंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावर्षीही फाउंडेशनतर्फे माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा वारक, वारक आदिवासी वाडी, कुशेडे शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना दप्तर व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना रजिस्टर, वह्या वाटप करण्यात आले. शिवाय सामाजिक सभागृह वारक व




अंगणवाडी वारक येथे राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आकार पोर्टचे विश्वस्त राजेश कुलकर्णी होते. तसेच उषःकाल प्रतिष्ठान संस्थापक विश्वस्त नामदेव शिंदे, शिक्षक मोरे गुरुजी, प्रवीण जाधव, नामदेव वाढवळ, विनोद, सखाराम शिंदे, गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रमोद शिंदे यांनी केले. उषःकाल फाऊंडेशन सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करेल, असे राजेश कुलकर्णी यांनी या कार्यक्रमात बोलताना उषःकाल फाऊंडेशनचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमासाठी उषःकाल टीम व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# ‘आदर्श’चा व्यवसाय शंभर कोटीने वाढवणार –अभिजित पाटील




**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचा एकत्रित व्यवसाय चालू आर्थिक वर्षात शंभर कोटीने वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. उत्तर रायगडात आदर्श पतसंस्थेच्या शाखा सुरू करणार, अशी घोषणा आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी केली.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कुरूळ येथील क्षात्रैक्य माळी समाज सभागृहात मंगळवारी (दि. ८) आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी आदर्शचे अध्यक्ष अभिजित पाटील होते. आदर्शचे संस्थापक सुरेश पाटील, आदर्शचे उपाध्यक्ष कैलास जगे तसेच सर्व संचालक सभेला उपस्थित होते. २५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला सदस्यांचीदेखील विक्रमी उपस्थिती होती.

संस्थेच्या भागधारकांना सलग चौथ्या वर्षी ११ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. आदर्श पतसंस्थेमध्ये शून्य टक्के एनपीए आहे. एक टक्क्याच्या आत ग्रॉस एनपीए आहे. सन २०२२-२३ या वर्षात ५३ कोटी ४६ लाख रूपयांनी ठेवींमध्ये वाढ झाली. ठेव वाढीचे प्रमाण २१.४३ टक्के आहे. संस्थेच्या ठेवी ३०२ कोटी ९२ लाख रुपयांच्या आहेत. कर्ज वाटप ३१ कोटी ६४ लाख रूपयांनी वाढले असून एकूण २०५ कोटी १६ लाख रूपये कर्ज वाटप करण्यात आले आहे. एकत्रित व्यवसाय ५०८ कोटी आठ लाख रुपये आहे. १३३ कोटी सहा लाख रूपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे, अशी माहिती अध्यक्ष अभिजित पाटील यांनी या सभेत सभासदांना दिली.

संस्थेने ५०८ कोटी रूपयांचा व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६२० कोटी रुपये व्यवसायाचा टप्पा ओलांडण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे, असे अध्यक्षांनी सांगितले.

# प्रश्नमंजुषा परीक्षेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित आयोजित स्वतंत्र दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव येथे श्री कॉम्प्युटर नांदगाव यांच्यामार्फत प्रश्न मंजुषा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात या विद्यालयातील ६७० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

प्रश्न मंजुषा स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी असे दोन गटांमध्ये ही परीक्षा घेण्यात आली. प्रत्येक गटात अव्वल येणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना बक्षिस व सर्वांना



सहभाग प्रमाण पत्र देण्यात येणार आहे. ही प्रश्न मंजुषा परीक्षा ही स्वतंत्र साठी त्याग करणारे स्वतंत्र सैनिक, त्या काळातील उठाव व सामान्य ज्ञान यावर प्रश्न विचरण्यात आले होते. ही परीक्षा ३० गुणाची होती व त्यासाठी ३० मिनिट वेळ देण्यात आली होती.

पेपर तपासून मुलांना बक्षीस देण्यात येणार आहेत. ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी श्री कॉम्प्युटरचे केंद्र संचालक पूर्वा प्रतीक पेडणेकर, मुखध्यापक श्रीधर ओव्हाळ,पर्यवेक्षक अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, शिक्षकेत्तर प्रतिनिधी संतोष बुल्लु, प्रतीक पेडणेकर, दत्तात्रय खुलपे, राहील घलटे, योगेश पाटील, अमर दरणे व सर्व शिक्षक यांनी विशेष योगदान दिले.

परीक्षा घेण्यासाठी सहजीवन विद्या मंडळ अध्यक्ष फैरोज घलटे व सर्व संचालक यांनी परवानगी दिल्याबद्दल पूर्वा पेडणेकर यांनी विशेष आभार मानले.


## TENDER NOTICE

RAYAT SHIKSHAN SANSTHA, SATARA invites sealed TENDERS in 2 envelope system from reputed, experienced and qualified contractors for the work mentioned below.

1) Name of Work : FIRE FIGHTING for the proposed PROFESSIONAL COLLEGE, PLOT NO. 41, SECTOR 11, KAMOTHE, NAVI MUMBAI on with Material basis.

2) Estimate cost: Rs 35,00,000/-

(Rupees Thirty Five Lakhs)

3) E.M.D.: Rs 35,000/- (Rupees THIRTY FIVE THOUSAND Only) by DD of Nationalized Bank in favour of PROFESSIONAL COLLEGE, KAMOTHE

4) Cost of blank Tender: Rs.1000/- (Rupees One Thousand Only Non-refundable)

https://edumart.set.co.in first supply registration

5) Criteria:-

5.1) The average turnover of the contractor for the last three years should not be less than Rs. 1.5 Crore.

5.2) The contractor should have completed 2 Government jobs of similar work of Not less than Rs. 80 Lakhs each in last three financial years OR 1 Government job of similar work of Not less than Rs. 1.0 Crores in last three financial years OR 2 Private jobs of similar work of of Not less than Rs. 1. Core each in last three financial years OR 1 Private job of similar work of of Not less than Rs. 1.0 Crores in last three financial years.

6) Place of sale of Tender Rayat Shikshan Sanstha, Raigad Region, Plot No.40, Sec 6A, Kamothe (Loknete Ramshet Thakur School 5th Floor), From 11.00 am to 5.30 pm on 13/08/23 to 17/08/23

7) Prebid meeting on 18/08/2023 at Above address at 12.30 pm

8) Date of Submission of Tender: Rayat Shikshan Sanstha, Raigad Region, Plot No.40, Sec 6A, Kamothe (Loknete Ramshet Thakur School 5th Floor), on 22/08/2023 before up to 3.00 pm.

9). Date of Opening of Tender: 22/08/2023

4.00 pm at same place.

10). Completion period: 12 months including Monsoon.

Neither the Owner nor the Consultant/Architect is bound to accept the lowest and can reject any or all the tenders without assigning any reason thereof.

**Architect**
**1. DHUMAL & ASSOSCIATES**
**2. NARENDRA VALANJU**

**Secretary**
**Rayat Shikshan Sanstha,**
**Satara**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the scheduled Property mentioned hereunder is owned by and is in actual physical possession of 1. Ramchandra Shivram Pandit, 2. Nalini Narayan Patil, 3. Jaywant Rajaram Patil, 4. Haresh Rajaram Patil, 5. Gulab Prakash Patil, 6. Mathura Bharat Bhoir, 7. Chandrabai Meghnath Pandit 8. Sanjay Meghnath Pandit 9. Mahesh Meghnath Pandit 10. Vasundhara Shyam Bhoir 11. Divya Deepak Bhoir. (hereinafter referred to as the Owners) claiming the sole owners having absolute right, title and interest holders thereof. The owners claim that their rights are free from all encumbrances, charges, claims, etc. of

whatsoever nature and that they have clear and marketable title in respect of the 'Scheduled Property'. This public notice is issued for verification of the title of the 'Owners' with respect to the 'Scheduled Property' as my clients Mr. Inderpalsingh Balbirsingh Purewal and Arjunsingh Inderpalsingh Purewal intend to purchase the Scheduled Property from the 'Owners'.

Any Party/person including any banks, financial institutions, or any other party or person having any objection and/or claim or demand in respect of the said Property by way of sale, exchange, mortgage, gift, lease, assignment, lien, charge, trust, agreement, lis pendens, stay order, attachment, acquisition, decree, succession, maintenance, easement, possession, under any agreement or otherwise howsoever may file their written objection addressed to the undersigned within a period of 21 days from the date of publication of this notice with my office at: Sonam Gond, Office: F/11, Nandanvan CHSL, Link Road, Kandivali (W), Mumbai-67. Email ID-singh.inderpal31@gmail.com

**SCHEDULED PROPERTY**

All that piece and parcel of Land situated at Village - Jui, Taluka- Uran, Dist- Raigad, Survey No. 99, Hissa No. 8, adm. about 0.23.00 cultivable Ha. along with 0.3.30 Ha. non-cultivable total adm. about 0.26.30 Ha. at assessment tax Rs. 1.87 (Said Property)

Hence this notice

**sd/-**
**Advocate**

**Date : 13/08/2023**

**ADV. SONAM GOND**
**BLS/LLB**

**OFFICE: F/11, Nandanvan Chsl, Off Link Road, Near Laljipda Police Chowki, Off Link Road, Kandivali West, Mumbai 400 067 EMAIL ID: singh.inderpal31@gmail.com**
**CONATCT NO. 91 8779871491**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to all that my clients **Mr. Inderpal Balbirsingh Purewal and Arjunsingh Inderpalsingh Purewal,** have purchased the all that piece and parcel of land Mauje Jui, Taluka- Uran, Dist- Raigad, Survey No. 102, Hissa No. 21, adm. about 0.57.30 cultivable hecter along with 0.27.70 hectre non-cultivable total adm. about 0.85.00 hectre at assessment tax Rupees 3.95 out of which 0.20.00 hectre has been purchased by my clients vide Registered Sale Deed from 1. Shri. Mahadev Vithhal Bhoir, 2. Smt. Alka Manaji Bhoir, 3. Shri. Ganesh Manaji Bhoir, 4. Smt. Hausa Manaji Bhoir, 5. Shri. Patvardhan Waman Bhoir, 6.

Shri. Mukund Waman Bhoir, 7. Shri. Kishor Waman BHoir, 8. Shri. Prakash Waman Bhoir, 9. Smt. Surekha Ganesh Mohite, 10. Smt. Pratibha Parshuram Patil, 11. Smt. Yamuna Vasant BHoir, 12. Miss. Minakshi Bharat Patil, 13. Smt. Anita Vasant Bhoir, 14. Shri. Nailesh Vasant Bhoir, 15. Smt. Dhanvanti Vasant Bhoir, 16. Shri. Hareshwar Vasant Bhoir, 17. Shri. Gajanan Arjun Bhoir, 18. Smt. Canguna Arjun Bhoir, 19. Smt. Komal Kantilal Patil, 20. Miss. Akshata Kantilal Patil.

Any Party/person having any objection and/or claim or demand in respect of the said Property by way of sale, exchange, mortgage, gift, lease, assignment, lien, charge, trust, license, maintenance, easement, possession under any agreement or otherwise howsoever may file their written objection addressed to the undersigned within a period of 21 days from the date of publication of this notice with my office at: Sonam Gond, Office: F/11, Nandanvan CHSL, Link Road, Kandivali (W), Mumbai-67. Email ID- singh.inderpal31@gmail.com

**SCHEDULED PROPERTY**

All that piece and parcel of 0.20.00 Ha. Of Land out of total adm. about 0.85.00 Ha. situated at Village - Jui, Taluka- Uran, Dist- Raigad, Survey No. 102, Hissa No. 21, adm. about 0.57.30 cultivable Ha. along with 0.27.70 Ha, non-cultivable at assessment tax Rs 3.95 (Said Property)

Hence this notice

**sd/-**
**Advocate**

**Date : 13/08/2023**

**ADV. SONAM GOND**
**BLS/LLB**

**OFFICE: F/11, Nandanvan Chsl, Off Link Road, Near Laljipda Police Chowki, Off Link Road, Kandivali West, Mumbai 400 067 EMAIL ID: singh.inderpal31@gmail.com**
**CONATCT NO. 91 8779871491**

# सानपाड्यातील बहुउद्देशीय इमारती दुर्लक्षित

**मच्छी मार्केटही समस्यांच्या विळख्यात**





**पनवेल : वार्ताहर**

शहरातील अनेक बहुउद्देशीय इमारती तसेच मार्केटची दुरवस्था झाल्याचे पहावयास मिळत आहे त्यातल्या त्यात अनेक वास्तू आजही वापराविना पडून आहेत. त्यातच सानपाडा सेक्टर ५ येथील बहुउद्देशीय इमारत आणि मच्छी मार्केटच्या दुरुस्तीकडे मनपा प्रशासनाचा कानाडोळा झाल्याने सध्याच्या घडीला ही वास्तू समस्येच्या गर्तेत अडकली आहे.

नवी मुंबई महापालिका कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षितपणामुळे मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्या असून समस्याचे निवारण व्हावे यासाठी प्रशासक तथा मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांना सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी निवेदन दिले आहे. सुनियोजित शहर म्हणून नवी मुंबई महापालिकेची नावलौकिक आहे. नागरिकांच्या आवश्यक असणाऱ्या सुखसोयी-सुविधांची पुरेपूर गरज पूर्ण करण्याकरिता महापालिका प्रशासनाने आपली आठही विभागीय कार्यालयामध्ये विविध प्रशासकीय व बहुउद्देशीय, बाजार संकुले, इमारतींची बांधणी करून निर्माण करण्यात आली आहेत, परंतु महापालिका कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित आणि निष्काळजीपणामुळे अनेक इमारती समस्यांचे माहेर घर निर्माण झाले आहेत. त्यापैकी सानपाडा प्रभाग ६४, सेक्टर ५ येथील बहुउद्देशीय ईमारत आणि मच्छीमार्केट १८ फेब्रुवारी २०१० साली उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले, स्थानिक भूमिपुत्र, ग्रामस्थांच्या सेवेसाठी उभारण्यात आली.

काही वर्षांपासून ही शासकीय बहुउद्देशीय इमारत आणि मच्छी मार्केट समस्यांच्या विळख्यात अडकल्याची चित्र दिसून येत आहे. या इमारतीमध्ये शौचालयाची अवस्था दयनीय, दुर्गंधीयुक्त सुरू झाली, असून इमारतीस पाणीपुरवठा करणारी यंत्रणा (विद्युत मोटार) देखील चोरीस गेल्याचे माहिती मिळत आहे. इमारतीच्या देखभालीसाठी महापालिका प्रशासनामार्फत कोणतीच उपाय योजना, डागडुजी व्यवस्था केली जात नसल्यामुळे सदर इमारतीचे छत पावसाळ्यात गळत असल्याचे निदर्शनास आले आहे. कोट्यवधी रुपये खर्चून ग्रामस्थांना व्यवसायासाठी दिलेल्या बहुउद्देशीय ईमारत आणि मच्छीमार्केट समस्याची पाहणी केली असता स्वच्छ भारत अभियान स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत अधिकाऱ्यांना या इमारतीचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. बहुउद्देशीय इमारतीमधील गाळ्यांचे दरवाजे पूर्णपणे मोडकळीस आल्यामुळे रात्रीच्या वेळी या ठिकाणी मद्यपी, मद्यप्राशन किंवा गैरवर्तन होत असल्याचे सूत्रांकडून माहिती मिळते, यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

ही इमारत बहुउद्देशीय असूनदेखील गेल्या काही वर्षांपासून महापालिका प्रशासनाने इमारतीच्या डागडुजीबद्दल कोणतीच उपाययोजना केली नसल्याची खंत आहे. वारंवार सानपाडा विभागांतील निष्क्रिय कार्यपद्धतीमुळे नागरिकांना अश्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तर त्याठिकाणी व्यवसाय न करता अनधिकृतपणे दुसरीकडे फुटपाथवर किंवा जागा मिळेल तिथे उघड्यावर, व्यवसाय करावा लागत असल्याचे खंत स्थानिक महिला मासेविक्री व्यावसायिक व्यक्त करतात. त्यामध्ये विद्युतपुरवठा कमतरता, पाणीपुरवठा अभाव, स्वच्छतेचा अभाव, असुरक्षित इमारत, वेळोवेळी डागडुजी झाली नाही. तरी आपण सदर इमारतीची पाहणी करून गांभीर्यपूर्वक कार्यवाही करावी, अशी मागणी निलेश सोमाजी कचरे यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांना केली आहे.

> **या वास्तूच्या दुरुस्तीबाबत टेंडर काढण्यात आले आहेत. तसेच पाणी व विजेचीजी समस्या आहे त्याबाबत संबंधित विभागाला तश्या सूचना देण्यात आल्या आहेत. साफसफाई करण्याबाबतदेखील कळविण्यात आले आहे.**
>
> **-भरत धांडे, सहाय्यक आयुक्त, तुर्भे विभाग**

# नवी मुंबईतही घरोघरी तिरंगा फडकविण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्धापन दिनाची सांगता ३० सप्टेंबर २०२३ रोजी होत असून केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मागील वर्षीप्रमाणेच याही वर्षी १३ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

कोणत्याही उपक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभागी होणाऱ्या नवी मुंबईकर नागरिकांनी या उपक्रमातही उत्साहाने सहभागी होऊन आपल्या घरावर १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत तिरंगा ध्वज फडकवून देशाविषयी आपल्या मनात असलेला अभिमान व्यक्त करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला जात असताना जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती चिरंतन तेवत रहाव्यात तसेच देशभक्तीची जाज्वल्य भावना मनात कायम रहावी या भावनेने आपल्या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक स्मरण करण्याच्या उद्देशाने हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा उपक्रम मागील वर्षाप्रमाणेच यावर्षीही राबविला जात आहे.

या कालावधीत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील प्रत्येक घरावर नागरिकांकडून उत्स्फुर्तपणे तिरंगा फडकविला जाणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने नागरिकांनी मागील वर्षी फडकविलेला व घरात जपून ठेवलेला तिरंगा यावर्षी फडकवावा. जर मागील वर्षीचा तिरंगा ध्वज उपलब्ध नसल्यास राष्ट्रध्वजाची उपलब्धता नागरिकांना सहजपणे व्हावी याकरिता केंद्र सरकारमार्फत प्रत्येक पोष्ट ऑफिसमध्ये जाऊन नागरिक ध्वज खरेदी करु शकतात.

नवी मुंबई महापालिकेनेही नागरिकांना राष्ट्रध्वज उपलब्ध करून घेण्यात अडचण येऊ नये याकरिता महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या आठही विभाग कार्यालयात राष्ट्रध्वज उपलब्ध करुन देणारी सुविधा केंद्रे सुरु केली असून नागरिकांना सवलतीच्या दरात काठीसह केवळ १५ रुपये मात्र या दरात राष्ट्रध्वज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली आहे.

भारतीय ध्वजसहिता २००२ मधील नियम १.२ नुसार भारतातील नागरिकांना राष्ट्रीय सणानिमित्त त्यांच्या घरांवर, कार्यालये, कारखाने, शालेय इमारती अशा विविध ठिकाणी ध्वजारोहणाचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. मात्र ध्वज फडकविताना व त्यानंतरही भारतीय ध्वजसंहितेतील नियमांचे पालन करणे गरजेचे असून याबाबत महापालिका स्तरावरुन नागरिकांच्या माहितीसाठी व्यापक जनजागृती करण्यात यावी असेही निर्देश आयुक्तांनी दिलेले आहेत.

आपल्या देशाबद्दल प्रत्येकाच्या मनात असलेला आदर व सन्मान अभिव्यक्त करण्यासाठी 'घरो घरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा' हा उपक्रम ही एक चांगली संधी असून यामध्ये प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने सक्रीय सहभागी होऊन आपल्या मनात असलेली देशभक्ती मूर्त स्वरुपात प्रकट करण्याच्या दृष्टीने आपल्या घरावर १३ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत तिरंगा फडकवावा आणि १६ ऑगस्ट २०२३ रोजी तो सन्मानपूर्वक उतरवून जतन करून ठेवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# श्रमिक सेना युनियनतर्फे भरघोस पगारवाढीचा करार

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई एमआयडीसी कोपरखैरणे नाका येथील मे. क्झोनोबेल इंडिया लि., कारखान्यात लोकनेते आमदार गणेश नाईक संस्थापक असलेल्या श्रमिक सेना ही संघटना गेल्या २० वर्षापासून मान्यताप्राप्त संघटना म्हणून कामगारांचे नेतृत्व करीत असून, संघटनेने आतापर्यंत चार भरघोस पगारवाढीचे करार केले आहेत.

संघटनेच्या वतीने कामगारांच्या पगारवाढीचे मागणी पत्र ऑगस्ट २०२२ मध्ये कंपनीला पाठविले होते. सदर कराराच्या बाबतीत संघटनेचे अध्यक्ष खासदार डॉ. संजीव नाईक यांना कामगारांच्या समस्यांची जाणीव असून त्यांनी वेळोवेळी हा करार घडवून आणण्यास मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच संघटनेचे सरचिटणीस चरण जाधव यांनी व्यवस्थापनाशी वेळोवेळी बैठका घेऊन अखेर ११ ऑगस्ट २०२३ रोजी २८,००० रुपये पगारवाढ देणारा ऐतिहासीक करार घडवून आणला.

करारावर कंपनीच्या वतीने वर्कस मॅनेजर अभिजित पाटील, मॅनेजर एच. आर. जयसन पिंटो, प्रणव शर्मा, प्रॉडक्शन मॅनेजर दिपेन पटेल यांनी व युनियनच्या वतीने अध्यक्ष खासदार डॉ. संजीव नाईक, सरचिटणीस चरण जाधव यांनी व कामगार प्रतिनिधी सचिन पाटील, राकेश राजिवडे, राहुल कांबळे, मनोज कणेकर, गुरुप्रसाद दळवी, रमाकांत पाटील, अमोल देशमुख, दिनेश पाटील, सोमेश्वर भंडारे, गोविंद पंडित यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

भरघोस पगारवाढ देणारा करारामुळे कंपनीतील कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांनी लोकनेते आमदार गणेश नाईक श्रमिक सेनेचे अध्यक्ष डॉ. संजीव नाईक, उपाध्यक्ष संदीप नाईक, उपाध्यक्ष सागर नाईक यांचे आभार व्यक्त केले आहेत. नवी मुंबईतील ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील कामगार वर्ग श्रमिक सेना युनियनला धन्यवाद देत आहेत.

# ऐरोलीत आज श्रावण महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पक्ष नवी मुंबईच्या वतीने श्रावण महोत्सव २०२३चे आयोजन रविवारी (दि. १३) ऐरोली सेक्टर १९ येथील महावीर हॉल येथे दुपारी १ वाजता करण्यात आले आहे.

या महोत्सवाला लोकनेते आमदार गणेश नाईक, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, नवी मुंबई जिल्हा भाजपचे अध्यक्ष संदीप नाईक, माजी सभापती अनंत सुतार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहेत. या महोत्सवामध्ये सौंदर्य स्पर्धा, गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम व प्रेक्षकांसाठी लकी ड्रॉ आयोजित करण्यात आलेला आहे, अशी माहिती आयोजक ॲड. रंजना वानखडे यांनी दिली आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेने एकाचा मृत्यू

**दांडफाटा येथील घटना**

**पनवेल : वार्ताहर**

पानटपरीवर पान आणणेकरीता उभ्या असलेल्या व्यक्तीचा अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू झाल्याची घटना पनवेल-पुणे महामार्गावर दांडफाटा येथे घडली आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्हॅनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दांडफाटा परिसरात राहणारे प्रमोदकुमार यादव हे पनवेल-पुणे महामार्गावर असलेल्या पानटपरीवर पान आणण्यासाठी आले असता कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, बेदरकारपणे वाहन चालवुन रोडचे बाजुला उभे असलेल्या प्रमोदकुमार यादव यास जोरदार धडक दिली. या धडकेत प्रमोदकुमार यादव गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता एमजीएम हॉस्पीटल कामोठे येथे दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्हॅनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक लाला लोणकर करीत आहेत. दरम्यान, या अपघाताबाबत किंवा वाहनाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस उपनिरीक्षक लाला लोणकर (८०८७२५७७११) यांच्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल तसेच रोख रकमेचे बक्षीस देण्यात येईल असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# प्रेरणा कवितासंग्रहाचे प्रकाशन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**




शिरवणे गावातील एक आदर्श व्यक्तिमत्त्व, माजी मुख्याध्यापक गुरुवर्य बाळकृष्ण हरी सुतार (गुरुजी) यांच्या ८६व्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवर्य बाळकृष्ण हरि सुतार (गुरुजी) यांच्या प्रेरणा कवितासंग्रह भाग ३ या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते हरि निवास, शिरवणे येथे झाला.

गुरुवर्य बाळकृष्ण हरी सुतार (गुरुजी) यांनी यापूर्वी प्रेरणा कवितासंग्रह भाग १ आणि भाग २ हे प्रकाशित केलेले आहे. तसेच आज नव्याने प्रेरणा कविता संग्रह भाग ३ प्रकाशित करीत आहेत. गुरुवर्य बाळकृष्ण हरी सुतार (गुरुजी) यांनी एक आदर्श शिक्षक, नाट्यकलाकार, गायक, लेखक, व साहित्यिक अशा विविध स्तरावर उल्लेखनीय काम करून विविध पुरस्कार प्राप्त करून शिरवणे गावाचा नावलौकिक केलेला आहे. प्रेरणा कवितासंग्रह भाग ३ मध्ये अध्यात्मिक, ऐतिहासिक, निसर्ग, संसारिक, व चालु घडामोडीवर कविता लिहिलेल्या आहेत. त्या कविता वाचकांना उदभोदक ठरणार असून भावी पिढीला एक प्रेरणादायी ठरतील.

गुरुवर्य बाळकृष्ण हरी सुतार (गुरुजी) यांना माजी महापौर जयवंत सुतार यांनी तमाम नवी मुंबईतील नागरिकांच्या वतीने दीर्घायुष्य लाभो ही स्वयंभू गणेश चरणी प्रार्थना करून व प्रेरणा कविता संग्रह भाग ३ यांस मनःपूर्वक शुभेच्छा आपल्या भाषणात दिल्या.

या वेळी भगवान सुतार, नंदकुमारबुवा सुतार, गणेशबुवा ठाकूर, मीनाताई म्हात्रे, महादीबाई सुतार, रंजना म्हात्रे, पद्मावती नाईक, तुळशीराम सुतार, देवेंद्रबुवा पवार, डहाके गुरुजी, मध्वनाथ सुतार, बंडू सुतार, सोपान सुतार, जयवंत सुतार, सुरेश सुतार, कैलास सुतार, संतोष सुतार आदी उपस्थित होते.

# पार्किंगमधून ट्रक पळवला

**पनवेल : वार्ताहर**




टाटा कंपनीच्या १५ लाख रुपये किमतीच्या ट्रकचा अपहार केल्याप्रकरणी साहेबलाल (रा. कर्नाटक) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात कलम ४६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी युनूस शेख (रा. रसायनी) हे प्रफुल्ल पाठारे यांच्याकडे ट्रक चालवण्याचे काम करत होते. या वेळी कॉन्ट्रॅक्टर साहेब लाल याच्यासोबत त्यांची ओळख झाली. जानेवारीमध्ये साहेबलाल याने बीपीसीएल कंपनीमध्ये ओळख असून कंपनीला तीन वर्षाकरिता ट्रक पाहिजे असे सांगून वर्कऑर्डर देतो तुम्ही ट्रक खरेदी करा, असे सांगितले त्यामुळे त्यांनी कोपरखैरणे येथून १२ टायरचा एमएच ४० सीडी ११६७ हा ट्रक विकत घेतला. त्यानंतर १३ जुलै रोजी आसूडगाव येथील पार्किंगमध्ये तो पार केला व तो ट्रक साहेबलाल याच्याकडे चावी दिल्ली त्यानंतर ते ट्रक पाहण्यासाठी पार्किंग केलेला आसुडगाव येथे गेले असता ट्रक दिसून आला नाही. या वेळी चौकशी केली असता साहेब लाल हा पार्किंगच्या ठिकाणावरून पैसे भरून ट्रक घेऊन गेल्याची माहिती मिळाली साहेबलाल फोन केला असता त्यांना उचलला नाही त्याला वारंवार संपर्क केला असता गाडी घेऊन कर्नाटक येथे आल्याचे सांगितले. आजपर्यंत त्याने ट्रक परत न दिल्याने ट्रकचा अपहार केल्याप्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार नोंदणी, जनजागृती

**उरण : वार्ताहर**



रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय महालण विभाग फुंडे येथे मतदार नोंदणी व मतदार जनजागृती कार्यक्रम शुक्रवार (दि. ११) घेण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आमोद ठक्कर यांनी करताना लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार नोंदणी व योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी नव मतदार होणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे आवाहन केले. नायब तहसीलदार माधुरी म्हात्रे ह्यांनी मतदार जागृती व मतदार नोंदणी विषयी तपशीलवार माहिती दिली व १८ वर्षे पूर्ण करण्याऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करावी असे. त्यासाठी फॉर्म कसा भरावा त्यासाठी जोडावी लागणारी कागदपत्रे, भरावयाची माहिती तसेच ऑनलाईन फॉर्म कसा भरावा त्याची सखोल माहिती दिली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आप आपल्या गावात मतदार नोंदणीसाठी जनजागृती करावी, असे आवाहान करून लोकशाही बळकट करण्यासाठी हातभार लावावा, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ पी. जी. पवार ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी फॉर्मचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास तलाठी ज्योती भालचिम व महसूल सहाय्यक शेख हे उपास्थित होते. कार्यकर्माचे सूत्रसंचालन व आभार प्रा. पंकज भोये यांनी मानले. प्राणिशास्त्र विभागाचे डॉ राहुल पाटील, डॉ. आर. एस. जावळे, डॉ. श्रेया पाटील उपस्थित होते.

# उघड्या विद्युत डिपीमुळे शॉक लागून माकड जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे जुन्या महामार्गाच्या लगत असलेल्या खोपोली-गूडलक टॉकीजजवळच्या विद्युत डिपीमध्ये शिरल्याने माकडाला शॉक लागला. यामध्ये हे माकड ५० टक्के भाजल्याने गंभीर जखमी झाले आहे.

घटनास्थळी प्राणीमित्र हानिफ करंजीकर आणि दिनेश ओसवाल तत्काळ दाखल होत एमएससीबीची डीपीची लाईन बंद केली व जखमी माकडावर प्राथमिक उपचार करून या प्राण्याला रेस्क्यू करण्यात आले. पुढील उपचारासाठी प्राण्यांचा दवाखाना खोपोली येथे दाखल करण्यात आले आहे.

# मावळ लोकसभा मतदारसंघ समन्वयकपदी विक्रांत पाटील

**पनवेल : वार्ताहर**



आगामी लोकसभा निवडणुक जिंकण्यासाठी भाजपने जोरदार तयारी सुरू केली असून त्याकरिता महाविजय २०२४ ही मोहीम त्यांनी हाती घेतली आहे. त्या अंतर्गत राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघासाठी समन्वयक प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नेमले असून यामध्ये मावळ लोकसभा मतदारसंघासाठी समन्वयक म्हणून भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या संदर्भातील नियुक्तीपत्र विक्रांत पाटील यांना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते देण्यात आले. विक्रांत पाटील लोकसभा निवडणुकीत महायुतीतील तिन्ही पक्षांत समन्वय ठेवण्याचे काम करणार आहेत.

# रोहा बसस्थानक परिसर झाला स्वच्छ; दुरवस्था मात्र कायम!

## बाकडे तुटलेले, पावसाळ्यात गळती सुरूच

**रोहे : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाची वाहतूक स्वच्छ आणि सुंदर वातावरणात व्हावी या संकल्पनेनुसार राज्यातील सर्व बसस्थानके परिसर सुशोभीकरण व स्वच्छ करण्यास सुरुवात झाली आहे. त्याचा परिणाम रोहा बसस्थानकातही झालेला दिसून येत आहे. येथील बसस्थानक स्वच्छ रोज करण्यात येत आहे, मात्र बसस्थानकातील तुटलेले बाकडे व पावसाळ्यातील गळती कायम आहे.


(छाया : महादेव सरसंबे)

खासगी प्रवासी वाहतुकीच्या तुलनेत राज्य परिवहन महामंडळाचीही वाहतूक स्वच्छ आणि सुंदर वातावरणात व्हावी अशी सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी प्रशासनाला केली होती. त्यानुसार एसटी महामंडळाने राज्यातील एसटी बसस्थानके स्वच्छ, सुंदर बनवण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे.

रायगड जिल्ह्यातील तळे, श्रीवर्धन, रोहा, माणगाव, म्हसाळा आदी बसस्थानकांमध्ये रस्त्यांची, इमारतींची कामे करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील बसस्थानकांमधील रस्त्यांचे क्राँक्रीटीकरण व इमारतींच्या कामांसंदर्भात तातडीने प्रस्ताव सादर करावा, जेणेकरून निधीची तरतूद करता येईल, अशा सूचना महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी मुंबई येथे झालेल्या बैठकीत एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना केल्या होत्या. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आधी जिल्ह्यातील बसस्थानके सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे.

रोहा बसस्थानकात पूर्वी अस्वच्छता असल्यामुळे नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात होती, परंतु आता नियमित बस स्थानकात स्वच्छता ठेवली जात आहे. दोन सफाई कामगार आता बसस्थानकाची साफसफाई करण्यासाठी ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे स्वच्छतागृहसुद्धा आता चांगल्या पद्धतीने आहे.

रोहा बसस्थानकातील छप्पर पावसाळ्यात गळत असल्यामुळे पाणीगळती कायम आहे. ही गळती थांबवण्याची आवश्यकता आहे. पावसाळ्यात गळतीमुळे नागरिकांना असुविधा होत आहे. यावर उपाययोजना लवकरात करण्यात येणार असल्याचे दिसून येते. यासाठी पत्र व्यवहार चालू आहे, मात्र ही इमारत कोणी दुरुस्ती करायचे हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे, कारण हे बसस्थानक खासगीकरणातून बांधलेले आहे.

बसस्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी असलेले बाकडे तुटलेले आहेत. त्यामुळे प्रवाशांना सुविधा होत असून हे बाकडे दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. बसस्थानकात नामफलक आहे, पण तो दर्शनी भागात लावण्याची गरज आहे.

याशिवाय रोहा बसस्थानक आवारात पडलेले खड्डे यापूर्वी भरून काढलेले आहेत, पण हे खड्डे किती काळ टिकतील हे सांगता येत नाही. त्यामुळे हे खड्डे कायमस्वरूपी भरून काढण्याची आवश्यकता आहे.

# माणगाव येथील नेत्र तपासणी शिबिराचा १२० जणांनी घेतला लाभ

## ३६ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि. ९) नेत्रतपासणी व शस्त्रक्रीया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी १२० रुग्णांची तपासणी करून ३६ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या वेळी विजय मेथा, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील व त्यांचे सहकारी यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.


(छाया : सलीम शेख)

# सावित्री नदी, अनुषंगिक नद्या, उपनद्यांतील गाळ यांत्रिक पद्धतीने काढण्याच्या ई-लिलाव प्रक्रियेस मुदतवाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हयातील सावित्री नदी-बाणकोट खाडी (केंबुर्ली ते राजेवाडी) कुंडलिका नदी, रेवदंडा खाडी व सावित्री नदी, बाणकोट खाडी तसेच पाताळगंगा नदी, धरमतर खाडी, रेवदंडा खाडी, राजपूर खाडी व बाणकोट खाडी या खाडीपात्रामधील ड्रेजरद्वारे उत्खननासाठी सन २०२३-२४साठी राखीव असलेल्या रेती उपगटाचा जाहिर लिलाव ई-निविदेच्या प्रक्रीयेद्वारे २८ जून ते ५ ऑगस्ट वाळू लिलाव या कालावधीत आयोजित करण्यात आलेला असून याबाबत दै. पुण्यनगरी, दै.प्रहार या वृत्तपत्रात २८ जून २०२३ रोजी व जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांच्या http://mahatenders.gov.in तसेच www.raigad.gov.in संकेतस्थळावर २८ जून रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

यापैकी परिशिष्ट १मधील डेपो क्रमांक २,८ व ९करिता प्रत्येकी तीन निविदा प्राप्त झाल्याने ते वगळून शिल्लक असलेल्या वाळू डेपो क्रमांक १,३,४,५,६,७ हे फेरनिविदेसाठी प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे. हा लिलाव कालावधी ५ ते १२ ऑगस्ट या कालावधीकरिता राहील, असे आवाहन रायगड जिल्हा खनिकर्म अधिकारी मनोज मेश्राम यांनी केले आहे.

# स्वच्छ, सुंदर माणगावसाठी विद्यार्थी सरसावले

## नगरपंचायतीच्या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीने हाती घेतलेल्या स्वच्छता अभियानात विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी कर्मचारी व नागरिक शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी हातात झाडू, फावडे, कोयते घेऊन उतरले होते.

मे महिन्यापासून माणगाव नगरपंचायत कडून प्रत्येक महिन्याला शहरातील एक मार्ग घेऊन त्याचे १० टप्पे करून स्वच्छता करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. तालुक्यातील हमरस्ता म्हणजे कचेरी रोड कॉर्नर ते वाकडाई



देवी मंदिर या रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. या स्वछता अभियानात एकूण ५२६ विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. सर्व शासकीय कार्यालयांसह टिकम भाई मेथा कॉमर्स कॉलेज, द. ग. तटकरे कॉलेज (राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक) व विद्यार्थी, श्रद्धा इंग्लिश मिडियम स्कूल (स्काऊट गाईड) व विद्यार्थी, नूतन माध्यमिक विद्यामंदिर, एस. एस. निकम इंग्लिश स्कूल, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान बैठक समिती श्री सदस्य, अशोकदादा साबळे विद्यालयाचे विद्यार्थी, सेवाभावी संस्था, डॉक्टर आणि पंचायत समिती कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. यावेळी माणगाव प्रांत अधिकारी. डॉ. संदिपान सानप, तहसीलदार विकास गारुडकर, माणगांव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, गटविकास अधिकारी श्री. जठार, तसेच सर्व आजी माजी नगरसेवक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कचेरी रोड ते वाकडाई देवी मंदिर त्याचबरोबर ७०० मी. लांबीचे गटार स्वच्छ करण्यात आले. या अभियानात १५० शासकीय कर्मचारी अधिकारी, तर ५२६ स्वयंसेवी संस्था, नागरिक, विद्यार्थी असे ६७६ सदस्य सहभागी झाले होते. साफ केलेल्या गटारांवर जंतुनाशकांची पावडर टाकण्यात आली. अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात आली.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पेण नगर परिषदेतर्फे विविध उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मेरी मिट्टी मेरा देश अभियान ९ ते १४ ऑगस्टदरम्यान राबविण्यात येत असून शहरातील आपल्या मातीविषयी जनजागृती प्रेम, आणि साक्षरता निर्माण व्हावी या साठी पेण नगरपरिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबिवण्यात येत आहेत.


(छाया : इजाज मनियार)

या वेळी शनिवारी (दि. १२) सकाळी ६.४५ वाजता नगर परिषदेच्या प्रांगणात ध्वजारोहण, ११ वा. शिलाफलकाची उभारणी, सकाळी ११.१० वा. पंचप्रण शपथ घेणे, सकाळी ११.३० वा. स्वातंत्र्यवीरांना वंदन करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे, तसेच दुपारी १२:३० वा. विश्वेश्वर गार्डन येथे वसुधावंदन (अमृतवाटिका तयार करणे) कार्यक्रम होणार आहेत. माझी माती माझा देश उपक्रमांतर्गत व १३ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत हर घर तिरंगा हा उपक्रम राबवून प्रत्येक घरोघरी राष्ट्रध्वज फडकविण्याचे आवाहन मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले आहे.

# पेणच्या गणेशमूर्ती रेवदंड्यात विक्रीस दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्रासह देश विदेशात पेणमधील श्रीगणेश मूर्तींना विशेष मागणी आहे. त्यामुळेच रेवदंडा पंचक्रोशीतही पेण येथील श्रीगणेश मूर्ती विक्रीस उपलब्ध करण्यात आल्या आहेत.


(छाया : महेंद्र खैरे)

रेवदंडा शहरात श्री स्वामी समर्थ या केसरीनाथ वडके यांचे दुकानात पेणमधील एक ते पाच फुट उंचीच्या आकर्षक कलाकुसर केलेल्या मूर्ती प्रतिवर्षाप्रमाणे विक्रीस आणल्या आहेत. यामध्ये कोळी समाजासाठी खास आकर्षण असलेले कोळी बांधव व एकविरा मातेची नावीन्यपूर्ण मुर्ती लक्ष्य वेधून घेत आहे. गणेशोत्सव नजीक आल्याने श्रीगणेशभक्त मूर्ती पसंत करून अॅडव्हान्स बुकींग करीत आहेत.

यावर्षी माती आणि इतर साहित्यासह वाहतूक खर्चातही वाढ झाली आहे. त्यामुळे श्रीगणेशमूर्तींच्या किमतीत वाढ करावी लागते असे श्री स्वामी समर्थ दुकानाचे केसरीनाथ वडके यांनी सांगितले.

# पोलादपूरमध्ये वीरशैव माहेश्वर समाजाचा सोहळा उत्साहात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील वीरशैव माहेश्वर (जंगम) समाज संस्थेतर्फे पोलादपूर शहरातील भैरवनाथनगर येथील महिला सभागृहामध्ये विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठ नागरिक आणि मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.


(छाया : शैलेश पालकर)

या वेळी समाजाचे रायगड जिल्हाध्यक्ष अमित जंगम यांच्या अध्यक्षतेखालील या सोहळ्यामध्ये प्रमुख अतिथी म्हणून पैठण येथील संदीप जंगम, दासगांवच्या सरपंच तपस्या जंगम हे सिनेसृष्टीतील अभिनेते व लेखक उपस्थित होते. अधिक श्रावण महिन्यातील सोमवारनिमित्त शिवरूद्र अभिषेक आणि शिवलिलामृत ग्रंथाचे पारायण करण्याचा या सोहळयामध्ये उपक्रम पार पडल्यानंतर वीरशैव माहेश्वर (जंगम) समाजातील भगिनी आणि बांधवांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नागरिक, गुणवंत विद्यार्थी आणि मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

हावरे येथील अध्यक्ष सुरेश जंगम, दिविल येथील उपाध्यक्ष मंगेश जंगम, पोलादपूर येथील रहिवासी सचिव अविनाश जंगम, सहसचिव बळीराम जंगम, निलेश जंगम, हरिभाऊ जंगम, रणजित जंगम, सहउपाध्यक्षा मधुमती जंगम, सुरेखा जंगम तसेच अन्य मान्यवर समाजबांधव व भगिनी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्ह्यात रिल मेकिंग स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणानुसार भारतात प्रौढांमध्ये (१५-४९ वर्षे) एचआयव्ही-एड्सचे सर्वसमावेशक ज्ञान २१.६ टक्के महिलांमध्ये आणि ३०.७ टक्के पुरुषांमध्ये आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे निमित्त साधून जिल्ह्यात जिल्ह्यातील महाविद्यालय स्तरावर एचआयव्ही-एड्स जनजागृती होण्याच्या दृष्टीने रिल मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेत रेड रिबन क्लब असलेल्या प्रत्येक महाविद्यालयातील गटाने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी केले आहे.

रेड रिबन क्लबद्वारे तरुणांमध्ये एचआयव्ही आणि एड्सबाबत जागरूकता वाढविण्यासाठी मास मीडिया ही लोकप्रिय पद्धत आहे. रेड रिबन क्लबद्वारे समवयस्कांना एचआयव्ही आणि एड्सबद्दल जागरूक करण्यासाठी रील मेकिंग प्रकारांचा वापर करण्यात येणार आहे. ही ऑनलाईन रील मेकिंग स्पर्धा ३० सेकंद ते १ मिनिटाची असेल. यात प्रथम विजेत्यास पाच हजार, द्वितीय तीन हजार ५०० तर तृतीय क्रमांकास दोन हजार रुपयांचे बक्षीस असणार आहे. या स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्या स्पर्धकास राज्यस्तरावर घेण्यात येणाऱ्या स्पर्धेकरिता पाठविण्यात येणार आहे.

एचआयव्हीचा प्रसार कसा होतो, कलंक व भेदभाव, नॅको एड्स अॅप किंवा १०९७ टोल फ्री क्रमांकाचे फायदे, एचआयव्ही तपासणीस प्रवृत्त करणे या विषयावर रील स्पर्धा (१८ ते २५ वयोगटातील) इच्छुक विद्यार्थी-विद्यार्थ्यांमार्फत घेण्यात येणार असून ही रील १८ ऑगस्टपर्यंत जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांच्या ७७९८०८७९९९ या मोबाईल क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



# वळके शाळेत आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

को.ए.सो.च्या मुरुड तालुक्यातील वळके येथील माध्यमिक शाळेत आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व तसेच फायदे समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमात जेएसडब्ल्यू कंपनीच्या सीएसआर विभागाचे राम मोहिते, वळके शाळेचे मुख्याध्यापक आर. डी. नाईक, रायगड जिल्हा कराटे असोसिएशनचे नंदकुमार वरसोलकर, प्रशांत म्हात्रे, रेवदंडा शाळेचे श्री. पांढरे व अन्य शिक्षकांची उपस्थिती होती. या वेळी दर्शना सातामकर यांनी मार्गदर्शन केले, तर उपस्थित विद्यार्थ्यांनी नेहमीच्या आहारामध्ये पौष्टिक तृणधान्याचा वापर करण्याचा संकल्प केला.

## घरोघरी तिरंगा अभियान

# ध्वजविक्री जनजागृतीसाठी म्हसळ्यात पोस्ट ऑफिसची रॅली

**म्हसळा : प्रतिनिधी**

सरकार १३ ते १५ ऑगस्टदरम्यान घरोघरी तिरंगा अभियान राबवित आहे. प्रत्येक घरात तिरंगा फडकविण्यासाठी भारतीय पोस्ट ऑफिस देशभरातील १.६० लाख पोस्ट ऑफिसमधून राष्ट्रीय ध्वजांची विक्री करणार आहे. यासाठी म्हसळा पोस्ट ऑफिसही सज्ज झाले आहे.

या पार्श्वभूमीवर म्हसळा पोस्ट ऑफिस कर्मचाऱ्यांनी मुख्य बाजारपेठ शहर, कन्या शाळा परिसर या विभागातून उपडाकपाल प्रचिती कोलन यांच्या मार्गदर्शनात व सहाय्यक डाकपाल मेघना कदम यांच्या नेतृत्वाखाली झेंडा रॅली काढली होती. या रॅलीला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.


(छाया : संजय खांबेटे)

चिखलप ब्रँच ऑफिसमधून शिंदे, शुभम नात्ती, अनिल गिऱ्हे, गोंडघर ब्रँच ऑफिसच्या श्रद्धा कांबळे, केलटे ऑफिसच्या संध्या मिंडे, कोलवट ऑफिसच्या ऋतिका, खरसई ऑफिसचे म्हात्रे, शुभम चौधरी, साळविंडे ऑफिसमधून जंगम, वरवठणे ऑफिसच्या पूजा चांदोरकर, अनंत जंगम, खामगाव ऑफिसचे दिनेश पारावे, मजगाव ताम्हाणे ऑफिसचे सौरभ गवते, तळवडे ऑफिसच्या वेदिका फुलझलके, पाभरे ऑफिसचे गोविलकर यांचा सहभाग होता.

ग्राहक ऑफलाइन तिरंगासुद्धा खरेदी करू शकणार आहेत. यासाठी तुमच्या जवळच्या पोस्ट ऑफिसला भेट देऊ शकता. ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही मोडमध्ये तिरंगा फक्त २५ रुपयांमध्ये खरेदी करता येईल. ग्राहक सुरुवातीला जास्तीत जास्त पाच ध्वज खरेदी करू शकतो. यावर कोणताही जीएसटी लागू नाही. खरेदीदाराने वितरण पत्ता आणि ध्वजांची संख्या देणे आवश्यक आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# टीम इंडिया प्रशिक्षकाविना जाणार आयर्लंड दौऱ्यावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुखापतीतून सावरणारा जसप्रीत बुमराह आयर्लंड दौऱ्यातून भारतीय संघात पुनरागमन करत आहे. युवा खेळाडूंची फौज असलेल्या या संघाचे नेतृत्व बुमराहकडे सोपवले गेले आहे. आयर्लंड दौऱ्यासाठी राहुल द्रविड आणि त्यांच्या सपोर्ट स्टाफला विश्रांती दिली गेली आहे, पण व्ही. व्ही. एस. लक्ष्मणही या दौऱ्यावर जाणार नाही. त्यामुळे भारतीय संघ प्रशिक्षकाविना या दौऱ्यावर खेळेल, परंतु सितांषू कोटक आणि साईराज बहुतुले हे सपोर्ट स्टाफ सदस्य संघासोबत असणार आहेत.



जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ तीन ट्वेन्टी-२० सामने खेळणार आहे. १८ ऑगस्टपासून आयर्लंडविरुद्धच्या मालिकेला सुरुवात होतेय. दुसरा व तिसरा टी-२० सामना अनुक्रमे २० व २३ ऑगस्टला खेळवला जाईल. तिन्ही सामने डब्लिनच्या द व्हिलेज स्टेडियमवर खेळवले जातील.

भारतीय संघात जसप्रीत बुमराह (कर्णधार), ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, टिलक वर्मा, रिंकू सिंग, संजू सॅमसन (विकेटकीपर), जितेश शर्मा (विकेटकीपर), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, प्रसीध कृष्णा, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार, आवेश खान यांचा समावेश आहे.

या वर्षी मार्चमध्ये बुमराहच्या पाठीवर शस्त्रक्रिया झाली आणि गेल्या सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेनंतर तो एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. बंगळुरू येथील नॅशनल क्रिकेट अकादमीच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी केलेल्या टाइमलाइननुसार बुमराह आधी ३० ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया चषकासाठीच परतण्याची अपेक्षा होती, मात्र बीसीसीआयने मेडिकल अपडेट जारी करून बुमराह लवकरच तंदुरुस्त होण्याची आशा व्यक्त केली होती. त्यानुसार त्याचे कमबॅक झाले आहे.

## रायगड जिल्हास्तरीय क्लासिक बेंच प्रेस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन संलग्न पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने जिल्हास्तरीय क्लासिक बेंच प्रेस स्पर्धा पेण सार्वजनिक विद्यालय येथे १६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे.



या स्पर्धेसाठी वजनाची वेळ सकाळी ८.३० ते ९ वाजेपर्यंत आहे. सर्व सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनिअर, मास्टर (पुरुष/महिला) स्पर्धकांनी याची नोंद घ्यावी आणि वेळेवर हजर राहावे तसेच योग्य गणवेश, शूज, गोल गळा बनियान (जिमचे नाव असलेली), साधा कॉस्च्युम असणे आवश्यक आहे. ज्या स्पर्धकावर वैद्यकीय उपचार सुरू असतील किंवा सर्दी, खोकला इत्यादी त्रास असेल तर अशांनी भाग घेऊ नये, असे कळविण्यात आले आहे.

या स्पर्धेत पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंची राज्य स्पर्धेसाठी पाठविण्यात येणाऱ्या रायगड संघात निवड केली जाणार आहे. राज्य स्पर्धा २६ व २७ ऑगस्ट रोजी पुणे वडगाव येथे होईल.

## अंबाती रायुडू सीपीएलमध्ये खेळणार

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारत आणि चेन्नई सुपर किंग्जचा (सीएसके) माजी फलंदाज अंबाती रायुडूने सेंट किट्स अ‍ॅण्ड नेव्हिस पॅट्रिओट्ससोबत करार केला आहे, ज्यामुळे तो कॅरिबियन प्रीमियर लीग (सीपीएल)मध्ये सहभागी होणारा देशातील दुसरा खेळाडू बनला आहे. वृत्तानुसार रायुडूला सेंट किट्स आणि नेव्हिस पॅट्रियट्स संघाकडून 'मार्की' खेळाडू म्हणून करारबद्ध केले आहे.



आयपीएल २०२३नंतर ३७ वर्षीय रायडूने अमेरिकेतील सीएसकेच्याच्या मेजर क्रिकेट लीग (एमएलसी)साठी टेक्सास सुपर किंग्ज (टीएसके) या फ्रँचायझीशी करार केल्याचे उघड झाले होते. तथापि, रायडूने एमएलसीमध्ये सहभागी न होण्याचा निर्णय घेतला, कारण भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) निवृत्तीनंतर लगेचच खेळाडूंना परदेशी लीगमध्ये सहभागी होण्यापासून रोखण्यासाठी 'कूलिंग ऑफ पीरियड' धोरण लागू करण्याचा विचार करत असल्याचे जाहीर केले होते, मात्र बीसीसीआयने अद्याप यावर निर्णय घेतलेला नाही.

रायुडूला सामन्यात खेळण्याची संधी मिळाल्यास तो सीपीएलमध्ये खेळणारा प्रवीण तांबेनंतरचा दुसरा भारतीय खेळाडू ठरेल. रायुडू हा सहा वर्षे भारतीय क्रिकेट संघाचा भाग होता, पण तो या दरम्यान सतत टीम इंडियामध्ये आत-बाहेर होत राहिला. २०१९च्या विश्वचषक स्पर्धेत तो भारतीय संघाचा एक भाग म्हणून दिसला होता, मात्र शेवटच्या प्रसंगी निवडकर्त्यांनी त्याला विश्वचषक संघात स्थान दिले नाही आणि त्याच्या जागी थ्रीडी खेळाडूची निवड करण्याबाबत सांगितले.

यापूर्वी रायुडू भारतीय संघासाठी चौथ्या क्रमांकावर दिसत होता, पण निवडकर्त्यांनी त्याचे पत्ता कट केला. नंतर निवडकर्त्यांचा हा निर्णय चुकीचा ठरला आणि जेव्हा टीम इंडिया वर्ल्ड कपच्या सेमीफायनलमध्ये पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडली तेव्हा चौथ्या क्रमांकाची अस्थिरता हे संघाच्या पराभवाचे मुख्य कारण मानले गेले. या वेळीही भारत चौथ्या क्रमांकावरील फलंदाज शोधत आहे. श्रेयस अय्यरच्या दुखापतीमुळे संघ अडचणीत दिसत आहे.

## बीओबी कप पटकाविण्यासाठी आज १०४ बुद्धिबळपटूंमध्ये चुरस

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या १५ वर्षाखालील मुला-मुलींच्या विविध सहा वयोगटातील विजेतेपदाचा बीओबी कप पटकाविण्यासाठी आंतरराष्ट्रीय फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटूसह १०४ खेळाडूंमध्ये चुरस राहील.

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभाग, आयडियल ग्रुप, आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना यांच्या सहकार्याने परळ आरएमएमएस येथे होणाऱ्या बुध्दिबळ स्पर्धेत सिध्दांत खेतान, दर्श राऊत, अर्जुन सिंग, कर्णव रस्तोगी, जश शाह, अथर्व कदम, सार्थक प्रसाद, वारी गोगरी आदी खेळाडू विजेतेपदाच्या दावेदारीसाठी लढतील.

बीओबी कप बुध्दिबळ स्पर्धा स्विस लीग पद्धतीने होणार असून प्रत्येक फेरी १५-१५ मिनिटे अधिक तीन सेकंद इन्क्रिमेंटची असेल. विजेत्या-उपविजेत्यांना एकूण ९० पुरस्कार तसेच प्रत्येक वयोगटातील सर्वोत्तम बुध्दिबळपटूला रोख रुपये तीन हजार असे एकूण सहा रोख पुरस्कार दिले जातील. प्रत्येक गटांमधील पहिल्या १० मुलांना व पहिल्या पाच मुलींना बीओबी कपचा पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. पारितोषिक वितरण समारंभ बँक ऑफ बडोदा मुंबई विभागाचे असिस्टंट जनरल मॅनेजर घनश्याम दास, आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते, मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धा

# स्पेन, स्वीडन संघ उपांत्य फेरीत

**वेलिंग्टन, ऑकलंड : वृत्तसंस्था**

सलमा पॅरालुएलो हिने अतिरिक्त वेळेत केलेल्या गोलच्या जोरावर जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानावरील स्पेनने गत उपविजेत्या नेदरलँडला २-१ असे नमवत महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. दुसरीकडे स्वीडनने जपानचे आव्हान २-१ असे परतावले.

युरोपातील दोन बलाढ्य संघांमधील सामन्यात पॅरालुएलोने १११व्या मिनिटाला विजयी गोल केला. नेदरलँड्सचा चार वर्षांपूर्वी फ्रान्समध्ये अंतिम लढतीत अमेरिकेविरुद्ध पराभव झाला होता.



मारियोना कालडेंटीने ८१व्या मिनिटाला गोल करत स्पेनला १-० असे आघाडीवर नेले. अखेरच्या दहा मिनिटांत नेदरलँडची बचावपटू स्टेफानी वान डर ग्राग्टने संघाला बरोबरी साधून दिली. तिच्या हाताला चेंडू लागल्याने स्पेनला ८१व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली होती. त्यावर मारियोनाने गोल केला. त्यानंतर पॅरालुएलोने विजयी गोल केला.

अलमांडा इलेस्टेडने ३२व्या मिनिटाला गोल करीत स्वीडनला आघाडीवर नेले. यानंतर फिलिपा एंजेल्डालने ५१व्या मिनिटाला पेनल्टी किकवर गोल करत संघाची आघाडी २-० अशी भक्कम केली. जपानकडून होनाका हयाशीने ८७व्या मिनिटाला गोल केला.

## आशिया चषक स्पर्धेसाठी बांगलादेशचा संघ जाहीर

**ढाका : वृत्तसंस्था**



बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्टार अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसनच्या नेतृत्वाखाली आशिया चषक स्पर्धेसाठी १७ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. ही स्पर्धा ३० ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या कालावधीत पाकिस्तान आणि श्रीलंकामध्ये खेळवली जाणार आहे. तत्पूर्वी बीसीबीने शाकिब हसनला वनडे संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त केले. तो आशिया चषक आणि त्यानंतर एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशचे नेतृत्व करेल.

शाकिब अल हसनपूर्वी तमिम इक्बालला वनडे संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले होते, मात्र, तो दुखापतीमुळे आशिया चषकातून बाहेर पडलाआहे. तमिमने यापूर्वी ६ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती, परंतु पंतप्रधान शेख हसीना यांच्या भेटीनंतर त्याने आपला निर्णय बदलला होता.

असा आहे संघ : शाकिब अल हसन (कर्णधार), लिटन दास, तन्झीद हसन तमीम, नझमुल हुसेन शांतो, तौहीद हृदयॉय, मुशफिकुर रहीम, मेहिदी हसन मिराज, तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान, हसन ममुद, महेदी हसन, नाझम हसन, ना. शमीम हुसेन, अफिफ हुसेन, शोरफुल इस्लाम, अबदोत हुसेन, मोहम्मद नईम.

# चेतेश्वर पुजाराने इंग्लंडमध्ये झळकवले शतक



**लंडन : वृत्तसंस्था**

डब्ल्यूटीसी फायनल २०२३ नंतर टीम इंडियातून वगळले होते. त्यानंतर चेतेश्वर पुजाराने इंग्लंडमध्ये शानदार शतक झळकावत फॉर्ममध्ये परतल्याचे संकेत दिले आहेत. खरंतर, पुजाराने इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या देशांतर्गत वनडे चषक स्पर्धेत ससेक्सकडून खेळताना शानदार शतक झळकावले आहे. त्याच्या शतकामुळे ससेक्सने सॉमरसेटचा ४ विकेट्सने पराभव केला. सलग तीन सामने गमावल्यानंतर ससेक्सचा हा पहिला विजय ठरला. ब गटात ससेक्स तळाशी आहे.

कूपर असोसिएट्स कौंटी मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात सॉमरसेट संघाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ६ गडी गमावून ३१८ धावा केल्या. सॉमरसेटकडून स्कॉटलंडच्या अँड्र्यू होप (११९) आणि कर्टिस कॅम्फर (१०१) यांनी शतके झळकावली. प्रत्युत्तरात ससेक्स संघाने ४८.१ षटकांत ३१९ धावांचे लक्ष्य पार केले. ससेक्ससाठी पुजाराने ११३ चेंडूत ११७ धावा करून नाबाद राहिला आणि संघाला विजयाकडे नेले. पुजाराने आपल्या खेळीत ११ चौकार मारले.

या खेळीद्वारे चेतेश्वर पुजाराने टीम इंडियात पुनरागमनाचे संकेत दिले आहेत. आपल्या शतकी खेळीमुळे चेतेश्वर पुजाराने लिस्ट ए मध्ये ५५०० धावा पूर्ण केल्या आहेत. हे त्याचे लिस्ट ए कारकिर्दीतील १६ वे शतक होते. पुजाराने आतापर्यंत १२१ लिस्ट ए सामन्यांमध्ये ५८.४८ च्या प्रभावी सरासरीने ५५५६ धावा केल्या आहेत. पुजाराने या फॉरमॅटमध्ये ३३ अर्धशतकेही झळकावली आहेत. याशिवाय पुजाराची लिस्ट ए मध्ये दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च सरासरी आहे.

## विराट कोहलीकडून चाहत्याला पुढच्या वेळी सेल्फी देण्याचा शब्द




**मुंबई : प्रतिनिधी**

विराट कोहली हा भारतातीलच नव्हे; तर जगभरातील प्रसिद्ध क्रिकेटपटूंपैकी एक आहे. त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहते नेहमीच उत्सुक असतात. प्रत्येक चाहत्याला विराटसोबत सेल्फी घ्यायचा असतो. आता सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये विराट त्याच्या एका चाहत्याला पुढच्या वेळी सेल्फी देण्याचा शब्द देताना दिसत आहे.

विराट कोहलीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हिडीओमध्ये किंग कोहली त्याच्या कारमध्ये बसायला जात आहे. मागून एक फॅन धावत येतो आणि सेल्फी मागतो. त्या वेळी हे ऐकून विराट चाहत्याला पुढच्या वेळी २५ तारखेला सेल्फी देतो. कोहलीचे म्हणणे ऐकल्यानंतर त्याचा चाहता म्हणतो, ठीक आहे. त्यानंतर विराट आपल्या गाडीत बसला. या संभाषणाचा व्हिडीओ आता सोशल माडियावर व्हायरल होत आहे.

विराट कोहली अनेकदा चाहत्यांना सेल्फी आणि ऑटोग्राफ देताना दिसतो. तो मैदानात आणि मैदानाबाहेर त्याच्या चाहत्यांना कधीही निराश करत नाही. विराटला सध्या टीम इंडियातून विश्रांती देण्यात आली आहे. तो ३० ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेतून कमबॅक करणार आहे.

# वनडे वर्ल्डकपबाबत सेहवागचा अंदाज

## सेमीफायनलसाठी निवडले चार संघ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाचा वनडे वर्ल्डकप भारतात रंगणार आहे. या विश्वचषक स्पर्धेची सुरुवात ५ ऑक्टोबरला होणार आहे. या विश्वचषकाची सारेच संघ जोरदार तयारी करताना दिसत आहेत. केवळ खेळाडूच नव्हे; तर क्रिकेट रसिकदेखील या स्पर्धेची आतुरतेने वाट पाहत आहेत. अशातच माजी भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग याने या स्पर्धेत उपांत्य फेरीतपर्यंत कोणते चार संघ मजल मारतील याबद्दलचा अंदाज वर्तवला आहे.



२०११नंतर तब्बल १२ वर्षे भारताला कोणतेही आयसीसी विश्वविजेतेपद जिंकता आलेले नाही. त्यामुळे भारतीय संघाला आपल्या भूमीवर स्पर्धा जिंकून दुष्काळ संपवण्याची ही चांगली संधी मानली जात आहे. ट्रॅक रेकॉर्ड आणि सातत्यपूर्ण कामगिरीमुळे टीम इंडिया उपांत्य फेरीत स्थान निश्चित करण्यासाठी प्रबळ दावेदार मानली जात आहे.

गतविजेता इंग्लंड आशियाई परिस्थितीत आपले विजेतेपद राखण्यासाठी कटिबद्ध आहे. गतिमान क्रिकेट आणि आक्रमक शैली अशी सध्याच्या इंग्लंडच्या संघाची ओळख आहे. इंग्लंडची फलंदाजी त्यांच्या जमेची बाजू ठरते. मोठ्या लक्ष्यांचा पाठलाग करण्याची त्यांची क्षमता आणि दडपणाखाली चांगली कामगिरी करण्याची जिद्द यामुळे ते टॉप ४मध्ये येऊ शकतात.

आयसीसीच्या स्पर्धांमधील सातत्यपूर्ण कामगिरी करणारा संघ म्हणजे ऑस्ट्रेलिया. ऑस्ट्रेलियन संघाला विजेतेपदाचा इतिहास तर आहेच, पण त्यासोबतच त्यांनी आतापर्यंत अनेक चांगले खेळाडूही घडवले आहेत. वनडे वर्ल्डकपमध्येही त्यांचे दमदार प्रदर्शन करणे अपेक्षित आहे.

कायम अंडरडॉग मानल्या जाणाऱ्या पाकिस्तानला यंदा भारतात क्रिकेटचे सामने खेळायचे आहेत. आयसीसी स्पर्धांमध्ये पाकिस्तानची सातत्यपूर्ण कामगिरी त्यांच्यासाठी फायद्याची ठरू शकते. अशा प्रकारे चार संघ सेहवागने निवडले आहेत.





# आशिया कपसाठी कॉमेंट्री पॅनेल जाहीर

## रवी शास्त्री, वसीम अक्रम, गौतम गंभीर आदींचा समावेश

**कराची : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धा सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस उरले आहेत. तत्पूर्वी या स्पर्धेसाठी समालोचकांची यादी जाहीर झाली आहे. त्यात भारत आणि पाकिस्तानमधील काही मोठ्या माजी क्रिकेट पटूंचा समावेश करण्यात आला आहे. एकूण १२ समालोचक या आशिया चषकात समालोचन करणार असून त्यापैकी पाच समालोचक हे भारतीय असतील.



भारतातून निवडलेल्या समालोचकांमध्ये गौतम गंभीर, रवी शास्त्री, संजय मांजरेकर, इरफान पठाण आणि दीप दासगुप्ता यांचा समावेश आहे. वसीम अक्रम, वकार युनूस, बाझिद खान आणि रमीझ राजा पाकिस्तानकडून यांचा समावेश करण्यात आला आहे. अजहर अली खान बांगलादेशकडून तर सह-यजमान रसेल अर्नोल्ड श्रीलंकेचे समालोचन करतील. स्कॉट स्टायरिसचादेखील यादीत समालोचक म्हणून समावेश करण्यात आला आहे.

### आकाश चोप्राला वगळले

*एका स्टार समालोचकाला या यादीतून वगळण्यात आले आहे. भारताचा माजी सलामीवीर आकाश चोप्राचा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रचंड चाहता वर्ग असून त्याला समालोचकांच्या यादीतून वगळण्यात आले आहे.*



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com